नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३२ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ०५ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# शिक्षण, सहकारातील धुरंधर हरपला

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन



कोल्हापूर (स. गांवकरी)

पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव तथा डॉ. डी. वाय. पाटील यांचे मंगळवारी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. ते ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी आणि बिहार, त्रिपुरा व पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल होते. महाराष्ट्रामध्ये शिक्षणसम्राट ह्या उपाधीने ओळखल्या जाणाऱ्या डी. वाय. पाटील ह्यांना १९९१ साली पद्मश्री हा पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूरमधील अंबप गावात झाला होता. कोल्हापूरच्या मातीतले रांगडे व्यक्तिमत्त्व होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य असलेले डी.वाय. पाटील १९५७ ते १९६२ दरम्यान कोल्हापूर शहराचे महापौर होते. १९६७ व १९७२ साली ते पन्हाळा विधानसभा मतदारसंघामधून विधानसभेवर निवडून आले होते. सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून सुरु केलेली राजकीय कारकीर्द पुढे अनेक मोठमोठ्या पदांपर्यंत घेऊन गेली. कार्यकर्ता, महापौर ते अगदी राज्याचे राज्यपाल, असा विस्मयचकित करणारा प्रवास डॉ. डी. वाय पाटील यांचा आहे. भाजपप्रणित एनडीए सरकार केंद्रात सत्तेत आल्यानंतर अनेक राज्यातील राज्यपालांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या ठिकाणी नवे राज्यपाल नियुक्त करण्यात आले. मात्र, राजकारणाच्या पलिकडचे व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील यांचे राज्यपालपद कायम ठेवण्यात आले होते. तेव्हा डॉ. डी. वाय. पाटील हे बिहारचे राज्यपाल होते.

देश-विदेशात शिक्षण आणि वैद्यकीय संस्था, तसेच नवी मुंबईतील खेळाचे भव्य मैदान असो, ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले. तिथे ठोस कामगिरी करत आपल्या नावाचं ब्रँड तयार केले. डी.वाय. पाटील ह्यांच्या नावाच्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. त्यामध्ये पद्मश्री डी.वाय. पाटील विद्यापीठ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, आंबी या विद्यापीठांचा समावेश आहे. शेकडो शिक्षण संस्थांचेव्यापक नेटवर्क असलेला व गुणवत्तेमुळेराज्यातच नव्हे, तर देशभरात ओळखला जाणारा डी. वाय. पाटील ग्रुप शैक्षणिक वटवृक्ष बनला आहे. ग्रुपच्या विविध संस्थांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेलेलाखो विद्यार्थी आज देश-विदेशांत उच्चपदावर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याला आकार देतानाच परंपरा जतन करून सुजाण नागरिक बनवण्यासाठी ग्रुपतर्फे नेहमीच प्रयत्न केला जातो. 'जे कराल तेमनापासून करा. जिथे जाल तिथेसर्वोच्च बना,' असा संदेश पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील नेहमी देत असतं. डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला -कुलगुरू डॉ. राजनीश कामत

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केली त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारावर दुःखाची छाया पसरली आहे. डॉ. पाटील यांना चिरशांती लाभो, अशी भावनाही कुलगुरूंनी व्यक्त केली आहे.

> शिक्षण, सहकार क्षेत्रातील कार्याने समाजकारण, राजकारणात भरीव योगदान देणारे आणि या क्षेत्रातील अनेक संस्थांचे आधारवड ठरलेले कार्यतपस्वी नेतृत्व पद्मश्री डॉ डी. वाय पाटील यांच्या निधनाने काळाने हिरावून नेले आहे, अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार, पश्चिम बंगाल, त्रिपुराचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. डॉ. पाटील यांच्या निधनामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.
>
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# सिद्धिविनायक मंदिरातील देणगी घोटाळा उघडकीस कसा आला?

मुंबई : (स. गांवकरी)



अयोध्येतील राम मंदिर देणगी अपहार प्रकरण समोर आल्यानंतर आता मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरातील देणगी अपहार प्रकरण समोर आलंय. यामुळे राज्यातील वातावरणही तापलं आहे. सुरुवातीला काही कर्मचारी व्हीआयपी दर्शनासाठी भाविकांकडून पैसे घेत असल्याच्या तक्रारींची चौकशी सुरू झाली होती. मात्र त्याच तपासादरम्यान देणगीपेटीतून पैसे चोरले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात आता विरोधकांनी भाजपावर टीका करायला सुरुवात केली असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंदिरातून दरवर्षी तब्बल १८ कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचा आरोप केला आहे. मात्र मंदिर प्रशासनाने हा आकडा फेटाळून लावत, संबंधित आरोपींना पकडून चोरीला आळा घातल्याचा दावा केला आहे. सिद्धिविनायक मंदिराचे विश्वस्त राहुल लोंढे यांनी सांगितलं की, २०२३ च्या अखेरीस नवीन विश्वस्त मंडळाची नियुक्ती झाल्यानंतर व्हीआयपी दर्शनासाठी पैसे घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत होते. त्यावेळी काही कर्मचाऱ्यांकडून देणगीपेटीतून पैसे चोरले जात असल्याचं फुटेजमध्ये दिसून आलं. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली आणि आरोपींना अटक करण्यात आली. तपासादरम्यान देणगी मोजण्याच्या प्रक्रियेवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. याच काळात एका दिवशी देणगी मोजणीच्या ठिकाणचा सीसीटीव्ही कॅमेरा जाणीवपूर्वक झाकल्याचं आढळलं. त्यामुळे संशय अधिक बळावला.

### देणगी वाढत नसल्याने निर्माण झाला संशय

मंदिरात भाविकांची संख्या वाढत असतानाही देणगीचे उत्पन्न मात्र स्थिरच राहिल्याने विश्वस्तांना संशय आला. त्यानंतर मंदिराचे अध्यक्ष आणि शिवसेना नेते सदा सरवणकर व विश्वस्त भास्कर शेट्टी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची मदत घेतली. त्यावेळचे एसीबी प्रमुख विश्वास नांगरे-पाटील यांनी काही अधिकाऱ्यांना तपासासाठी नियुक्त केलं. सुरुवातीला काहीही संशयास्पद आढळलं नाही. मात्र तपास सुरू ठेवण्याचा सल्ला देण्यात आला.

## थोडक्यात...

### ॲलोपॅथी डॉक्टरांचा बेमुदत संप!

पुणे (स. गांवकरी) : सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) उत्तीर्ण झालेल्या 'बीएचएमएस' डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये स्वतंत्र नोंदणी सुरू करण्याच्या आदेशाविरोधात महाराष्ट्र मेडिकल असोसिएशनने आता बेमुदत संप पुकारला आहे. या संदर्भात मंगळवारी रात्री महाराष्ट्र राज्यातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यामध्ये बेमुदत संपाबाबत निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बेमुदत संप करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यात ५२ हजार डॉक्टर महाराष्ट्र मेडिकल असोसिएशनशी निगडित आहेत, तर संघटनेच्या ३६ जिल्ह्यांमध्ये २३० शाखा कार्यरत आहेत. या संपाला पाठिंबा देण्यासाठी राज्यातील निवासी डॉक्टरांची संघटना 'मार्ड'ही आज, बुधवारपासून संपात सहभागी होत आहे. महाराष्ट्रातील एकूण ३२ शासकीय महाविद्यालयांतील 'मार्ड'चे डॉक्टर यात सहभागी होतील.

### कायद्यातील प्रमुख तरतुदींमध्ये सुधारणा

अमरावती (स. गांवकरी) : रेल्वेच्या आरक्षित डब्यातून अनधिकृतपणे प्रवास करणे आता महाग ठरणार आहे. याशिवाय विनातिकीट प्रवास, महिलांसाठी राखीव डब्याचा गैरवापर, तिकीट हस्तांतरण यासारख्या प्रकारांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. रेल्वे कायदा, १९८९ मधील प्रमुख तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली असून दंडाच्या रकमेत घशघशीत वाढ करण्यात आली आहे. मध्य रेल्वेने या सुधारित नियमांची माहिती देत प्रवाशांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. कलम १३७: योग्य पास, तिकिटाशिवाय फसवणूक करून प्रवास करणे यासाठी १ हजार रुपयांपर्यंत दंड, ६ महिन्यांपर्यंत कारावास किंवा दोन्ही, अशी तरतूद पुर्वी होती. आता सुधारित तरतुदीनुसार भाडे अधिक अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. ज्याची किमान रक्कम ५०० रुपये असेल. जर दोषी व्यक्तीने पैसे भरण्यास नकार दिला, तर प्रकरण न्यायालयात पाठवले जाईल. पैसे न भरल्यास, न्यायालय ६ महिन्यांपर्यंत कारावास, ५०० रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा सुनावू शकते.

### तब्बल ६६ हजार अपिले प्रलंबित

मुंबई (स. गांवकरी) : राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित असलेल्या सुमारे ६६ हजार प्रलंबित अपीलांचा जलद निपटारा करण्यासाठी बृहन्मुंबई, नाशिक आणि अमरावती खंडपीठांमध्ये तीन अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यात सध्या मुख्य माहिती आयुक्त आणि सात ठिकाणी माहिती आयुक्त कार्यरत आहेत. राज्य माहिती आयोगाकडे मे अखेर ६६ हजार द्वितीय अपिले आणि १४ हजार २४० तक्रारी प्रलंबित आहेत. मुंबई, नाशिक, अमरावती माहिती आयुक्तांकडे द्वितीय अपिलांची संख्या अधिक आहे. माहिती आयुक्तांकडील प्रलंबित अपिलांचा निपटारा होण्यासाठी तीन अतिरिक्त आयुक्ताची पदे निर्माण करुन या पदावर त्वरित आयुक्तांची नियुक्ती करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये राज्य सरकारला दिले होते. त्यानुसार बृहन्मुंबई, नाशिक आणि अमरावती खंडपीठांमध्ये तीन अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आयुक्तांची ही नियुक्ती तीन वर्षांसाठी असून त्यांच्या मदतीकरिता प्रत्येक खंडपीठासाठी एक उप सचिव आणि एक कक्ष अधिकारी अशी प्रतिनियुक्तीवरील पदे निर्माण करण्यात येणार आहेत.

# पहिल्यांदाच प्रवेशित विद्यार्थिसंख्या लाखानजीक

पुणे : (स. गांवकरी)



शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत यंदा उच्चांकी प्रवेश झाले आहेत. एकूण पाच फेऱ्यांतून ९६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आरटीईअंतर्गत प्रवेशित विद्यार्थी आठ हजारांनी वाढल्याचे स्पष्ट झाले असून, सुमारे १७ हजार जागा रिक्त राहिल्या आहेत. आरटीईअंतर्गत आर्थिक दुर्बल, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतात. शिक्षण विभागाने आरटीईअंतर्गत प्रवेशांसाठी यंदा नियमांत बदल केला होता. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरच्या परिसरातील शाळेत प्रवेश बंधनकारक करण्यात आला होता. त्यानुसार नोंदणी प्रक्रियाही करण्यात आली. मात्र, या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयाने शिक्षण विभागाचा नियम रद्द करण्याचा आदेश दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या घरापासून तीन किलोमीटर परिसरातील शाळा प्रवेशाची संधी पुन्हा उपलब्ध झाली. परिणामी, पुन्हा अर्ज नोंदणी करून प्रवेश प्रक्रिया राबवण्यास विलंब झाला. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत राज्यातील ८ हजार ७०१ शाळांतील १ लाख १४ हजार ८२६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध होत्या. त्यासाठी एकूण २ लाख ८९ हजार २८६ अर्ज दाखल झाले. प्रवेशासाठी काढण्यात आलेल्या ऑनलाइन सोडतीमध्ये १ लाख ५ हजार ८११ विद्यार्थ्यांची निवड झाली.

# कॉक्रोच जनता पार्टीच्या भवितव्याबाबत छत्रपती संभाजीनगरमध्ये बैठक

### राजकीय पक्षाबाबत सौरव दासचे मोठे विधान



मुंबई : (स. गांवकरी)

कॉक्रोच जनता पार्टीने जंतर-मंतरवर केलेल्या आंदोलनाला यश आल्यानंतर आता पुढे संघटनेची वाटचाल कशी असेल? याबाबत मंथन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवसांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवक्ते सौरव दास, आशुतोष रांका आणि इतर सहकारी सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी पोहोचले असून शहरात त्यांची बैठक होणार आहे.

मंगळवारी कॉक्रोच जनता पार्टीची टीम छत्रपती संभाजीनगरमध्ये आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. सीजेपी यापुढेही पारंपरिक राजकारणाला फाटा देत दबावगट म्हणून कार्यरत राहील, अशी भूमिका प्रवक्ते सौरव दास यांनी व्यक्त केली. भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या एका टिप्पणीवर केलेल्या उपरोधिक पोस्टनंतर कॉक्रोच जनता पार्टीचा जन्म झाला. त्यानंतर झालेल्या नीट पेपरफुटीविरोधात सीजेपीने आंदोलन पुकारले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचा राजीनामा घेण्यात यावा, या मागणीसाठी सीजेपीने जंतर-मंतरवर ३६ दिवस आंदोलन पुकारले होते. २५ जुलै रोजी धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. जेन-झींना त्यांच्या अधिकारांसाठी रस्त्यावर उतरवणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या भवितव्याबाबत आता चर्चा सुरू आहे. अभिजीत दिपके आणि त्यांची टीम राजकारणाचा पर्याय स्वीकारणार की फक्त दबावगट म्हणून काम करणार? असे प्रश्न विचारले जात होते. यावर सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी उत्तर दिले आहे.

"युवकांचा ऐतिहासिक असा विजय काही दिवसांपूर्वी मिळाला. यानंतर ही चळवळ कुठे जाणार? यावरच चिंतन करण्यासाठी आमची दोन दिवसांची बैठक होणार आहे. ही चळवळ आणखी कशी फोफावेल याचा विचार आम्हाला करायचा आहे.

### राजकीय पक्ष काढण्याचा विचार नाही

सीजेपी राजकीय पक्ष होईल, अशी चर्चा होती. यावरही सौरव दास यांनी स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, "या देशात दबावगट असणे खूप गरजेचे आहे. या देशात ७०० ते ८०० राजकीय पक्ष आहेत. तरीही लोकांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. याचा अर्थ राजकीय पक्ष काढणे, हे त्या समस्यांचे उत्तर नाही. तर समाजात जागृतीची आणि एका चळवळीची गरज आहे आणि तेच कॉक्रोच जनता पार्टी करण्याचा प्रयत्न करत आहे."

# ॲनालॉग पनीरवर वर्षभरासाठी बंदी : तुकाराम मुंढे

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या अनलॉग किंवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी घातली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुरुवारी यासंदर्भातील आदेश जारी केला. राज्यभरातील तपासणीत पनीरचे ३५.४ टक्के नमुने विहित मानकांशी विसंगत आढळल्याने आणि अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांशाचा वापर झाल्याचे स्पष्ट झाल्याने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. भाजपचे श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून याबाबत पाठपुरावा केला होता. पाचपुते यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांना पत्र लिहून राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग किंवा दुग्धेतर पनीरवर बंदी घालण्याची मागणी केली होती. ग्राहकांची दिशाभूल होत असून अशा उत्पादनांमुळे आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याचा मुद्दा त्यांनी पत्रात उपस्थित केला होता. या बंदीचचे स्वागत करत, अध्यादेशाची पूर्ण ताकदीने अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा पाचपुते यांनी व्यक्त केली.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरातून गोळा करण्यात आलेल्या ३०८ नमुन्यांच्या तपासणीत १०९ नमुने निकृष्ट किंवा असुरक्षित असल्याचे आढळले. त्यापैकी ७९ नमुने निकृष्ट दर्जाचे तर ३० नमुने थेट असुरक्षित असल्याचा प्रयोगशाळेचा अहवाल आहे. तपासणीत अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांश वापरण्यात आल्याचेही निष्पन्न झाले. दुधातील फॅट्स किंवा घटक काढून, त्याऐवजी वनस्पतीजन्य तेल, डालडा किंवा इतर दुधाव्यतिरिक्तच्या वस्तू वापरून बनवलेल्या पदार्थाला (ॲनालॉग) किंवा 'दुग्धेतर पनीर' म्हटले जाईल.



### बंदी आदेश काय म्हणतो ?

- ▲ उत्पादनापासून ते किरकोळ विक्रीपर्यंतच्या सर्व व्यवहारांवर राजपत्रात आदेश प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षासाठी बंदी
- ▲ हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स, क्लाऊड किचन आणि इतर खाद्यसेवा आस्थापनांनाही अशा दुग्धेतर पनीरचा कोणत्याही खाद्यपदार्थात वापर करता येणार नाही.
- ▲ ग्राहकांना ते अस्सल पनीर म्हणून देणे किंवा त्याबाबत माहिती लपविणे ही अनुचित व्यापार पद्धत मानून कारवाई केली जाईल.
- ▲ पनीर किंवा छेना विकणाऱ्या सर्व अन्न व्यवसायिकांना पॅकेजिंग व लेबलिंगबाबत अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे बंधनकारक.
- ▲ आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई

# खरातच्या बनावट खाते प्रकरणात पतसंस्था व्यवस्थापक अटक

राहाता : (स. गांवकरी)



समता पतसंस्थेच्या येथील शाखेत शंभर बनावट खाते प्रकरणात पोलिसांच्या शिर्डी एसआयटीने मोठी कारवाई करत, पतसंस्थेच्या राहाता शाखेचा व्यवस्थापक मिलिंद बनकर याला अटक केली. त्याला आज, मंगळवारी न्यायालयाने ४ दिवसांची (दि. ७) पोलिस कोठडी सुनावल्याची माहिती एसआयटीचे तपास अधिकारी तथा शिर्डीचे उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांनी दिली. मुख्य आरोपी भोंदू अशोक खरात याच्या चौकशीतून समोर आलेल्या धागेदोऱ्यांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. राहाता येथील समता पतसंस्थेत तब्बल ५७ व्यक्तींच्या नावावर १०२ बनावट खाती उघडण्यात आली होती. विशेष म्हणजे या सर्व खात्यांमध्ये भोंदू अशोक खरात याचेच नाव वारसदार म्हणून नोंदविण्यात आले होते. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. शिर्डी पोलिसांनी संबंधित खातेदारांची चौकशी केली असता, सर्वांनी आपण कोणतेही खाते उघडले नसल्याचे स्पष्ट सांगितले. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे ही खाती उघडण्यात आल्याचा संशय अधिक बळावला आहे. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याचा तपास सुरू आहे. बनावट खाती उघडण्यासाठी पतसंस्थेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची भूमिका काय होती, याचाही शोध घेतला जात आहे. या संर्दभात पतसंसंथेत १०२ खाते उघडतांना सह्या कोणी केल्या, या उघडलेल्या खात्यांवर रोख रक्कमा कोणी भरल्या, नंतर पैसे काढतांना खातेदारांच्या सह्या कोणी केल्या असा युक्तीवाद तपासी अधिकारी भारती यांनी न्यायालयासमोर केला. हा युक्तीवाद ग्राह्य धरुन अधिक तपास करण्यासाठी व्यवस्थापक मिलिंद बनकर याला ४ दिवसांची पोलिस कोठडी न्यायालयाने दिली. दरम्यान, मुख्य आरोपी अशोक खरात याला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याने त्याच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनंतर राहाता शाखेचा व्यवस्थापक मिलिंद बनकरला अटक करण्यात आल्याने तो चौकशीत काय माहिती देतो त्यानंतरच आणखी काही जणांवरही कारवाई होण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून व्यक्त केली जात आहे.



## दैनिक सार्वमंथनच्या वर्धापन दिन विशेषांकाचे डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते प्रकाशन!

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात अल्पावधीतच सर्वसामान्य जनतेच्या मनात स्थान निर्माण करून वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक सार्वमंथनच्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यावेळी दैनिक सार्वमंथनचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे यांनी डॉ. आरोटे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान दैनिक सार्वमंथन समूहाच्या वाटचालीची, विविध सामाजिक उपक्रमांची तसेच वर्तमानपत्राच्या विस्ताराची सविस्तर माहिती देण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सर्वसामान्य कुटुंबातील तरुणांनी जिद्द, परिश्रम आणि सातत्याच्या जोरावर दैनिक सुरू करून स्वतःची मालकीची जागा, आधुनिक प्रिंटिंग व्यवस्था उभारणे आणि अनेकांना रोजगार उपलब्ध करून देणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब असल्याचे सांगितले. पत्रकारितेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत केलेले



कार्य प्रेरणादायी असून भविष्यातही दैनिक सार्वमंथन अधिक प्रगती करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने अनिल कोळसे यांचा साईबाबांची मूर्ती, आकर्षक घड्याळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, अहिल्यानगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब पाटील वाकचौरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे दक्षिण नगर जिल्हा चिटणीस रमेश बोरुडे पाटील, संगमनेर तालुकाध्यक्ष संजय गोपाळे तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्यासह पत्रकार व मान्यवर उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा मागणीसाठी आमरण उपोषण



ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा तसेच याबाबतचा स्थानिक नगरसेवकांनी महापालिकेच्या महासभेत ठराव मांडून मंजूर करावा या प्रमुख मागणीसाठी दिव्यातील समाजसेवक सौरव अडागळे आणि सुवर्णा कांबळे यांनी आजपासून छत्रपती शिवाजी चौक, दिवा येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी विविध सामाजिक संघटना, आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, समाजबांधव तसेच स्थानिक नागरिकांनी उपोषणस्थळी भेट देत आपला पाठिंबा दर्शविला. दिवा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत असून, यासाठी आता लोकप्रतिनिधींनी महासभेत अधिकृत ठराव मांडून त्याला मंजुरी मिळवून द्यावी, अशी उपोषणकर्त्यांची भूमिका आहे. उपोषणस्थळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहत असून, विविध सामाजिक संघटनांकडून या आंदोलनाला वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. येत्या काळात या मागणीवर महापालिका प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी काय भूमिका घेतात, याकडे दिवाकरांचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री आरोग्य जन कल्याण समितीची बैठक संपन्न



नवीन नांदेड (स. गांवकरी) : दि 1ऑगस्ट रोजी बैठकीत समितीतील सदस्य तथा प्रभाग क्रमांक 20 मधील सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत विविध समस्या वर चर्चा करण्यात आली. सिडको येथील मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे आरोग्य 'जनकल्याण समिती अर्थात (महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य वैद्यकीय मदत) ही समिती स्थानिक आरोग्य केंद्राच्या विकासासाठी काम करत असून या समितीची बैठक दिनांक 1ऑगस्ट 2026 रोजी आरोग्य जनकल्याण समितीचे सदस्य विद्यमान नगरसेवक संजय पाटील घोगरे,वैजनाथ देशमुख,सौ.सुवर्णा सतिश बसवदे ,मंगलाताई देशमुख, सौ.निरंजना राजु लांडगे , नगरसेविका प्रतिनिधी उदय देशमुख यांनी बैठकीस उपस्थित होते.आरोग्य केंद्राचे " वैद्यकीय अधिकारी डॉ.संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी आशा वर्कर यांच्याशी विविध मुद्द्यावर चर्चा करून सिडको येथील आरोग्य केंद्रात महिला डॉक्टर ,बालरोग तज्ञ ' डॉक्टर ,परिचारिका व सेवक यांची पूर्तता करण्याची मागणी करण्यातआली. तसेच या ठिकाणी अंतर रुग्ण विभाग व त्यासाठी लागणारे कर्मचारी वर्ग व औष्ध पुरवठा वेळेवर उपलब्ध करून देणे वरील सर्व सुविधांची मागणी आरोग्य अधिकारी डॉक्टर संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी .आशा वर्कर यांनी केली तेव्हा आरोग्य समितीचे सदस्य तथा उपस्थित नगरसेवक यांनी सदरील प्रश्न आम्ही मनपाच्या सभेत ठेवून मान्यता घेऊन हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी या बैठकीस आरोग्य केंद्राचे आरोग्य कर्मचारी गलपवाड, ओमप्रकाश सूर्यवंशी, सुखदेव जोंधळे,परिचारिका प्रियंका रचेवार,जयश्री दरेगावे, माधवी पेंढारकर ,आशा वर्कर व समितीचे सदस्य यांची उपस्थिती होती. या बैठकीचे 'प्रास्ताविक' वैद्यकीय अधिकारी "डॉ.संतोष शिंदे यांनी केले तर आभार मीनाक्षी शिंदे यानी मानले.

## ठाणे महापालिकेच्या नऊ प्रभाग समित्यांवर अध्यक्ष विराजमान

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेच्या नऊ प्रभाग समितींच्या अध्यक्षपदासाठीची निवडणूक आज महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडली. या निवडणुकीसाठी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित होते. या निवडणुकीत 8 जणांची बिनविरोध निवड झाली असून मुंब्रा प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी निवडणूक पार पडली. या निवडणुकीत दिपाली भगत विजयी झाल्या.

# आधार केंद्र चालकांकडून अडवणूक व आर्थिक पिळवणूक

### चौकशी करून कठोर कारवाईची मागणी : हबीब खान मुसा खान यांचे तहसीलदारांना निवेदन; जिल्हाधिकाऱ्यांकडेही तक्रार

किनवट : (स. गांवकरी)



किनवट शहर व तालुक्यात कार्यरत असलेल्या विविध आधार नोंदणी व अद्ययावत (अपडेट) केंद्रांवर नागरिकांची अडवणूक करून त्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप करीत इस्लामपुरा येथील हबीब खान मुसा खान यांनी तहसीलदार, किनवट यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज सादर केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली असून या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी, नांदेड यांनाही पाठविण्यात आली आहे. तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, किनवट शहर व तालुक्यातील अनेक आधार केंद्रांवर आधार कार्डातील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, बायोमेट्रिक माहिती आदी दुरुस्तीसाठी येणाऱ्या नागरिकांना विविध कारणे सांगून वारंवार परत पाठविले जाते. "आज नाही, उद्या या", "सर्व्हर बंद आहे", "जन्मतारीख दुरुस्त होणार नाही", "लहान मुलांचे आधार अपडेट होत नाही", "सिस्टम बंद आहे" अशी कारणे देत नागरिकांना अनेक दिवस हेलपाटे मारण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रकमेची मागणी होत असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. काही केंद्रांवर ₹३०० ते ₹५०० किंवा त्यापेक्षाही अधिक रक्कम आकारली जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अनेकदा अधिकृत पावती न देता पैसे घेतले जात असल्याने सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, मजूर, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांना अशा प्रकारच्या मनमानीचा सर्वाधिक फटका बसत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. आवश्यक कागदपत्रे असूनही नागरिकांना वारंवार केंद्रावर बोलावून त्यांचा वेळ व पैसा वाया घालविला जात असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

हबीब खान मुसा खान यांनी आपल्या निवेदनात आधार सेवा ही केवळ सामान्य सेवा नसून नागरिकांच्या ओळखीशी, विविध शासकीय योजनांच्या लाभाशी तसेच डिजिटल सुरक्षेशी संबंधित अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे अशा सेवेमध्ये निष्काळजीपणा, मनमानी किंवा आर्थिक गैरव्यवहार होणे ही गंभीर बाब असून प्रशासनाने त्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासोबतच किनवट शहर व तालुक्यातील सर्व आधार केंद्रांची अचानक तपासणी करण्यात यावी, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष भेट देऊन पंचनामा करण्यात यावा, शासनाने निश्चित केलेले शुल्क, सेवा नोंदवही, पावत्या, परवानग्या व इतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी, तसेच नागरिकांकडून जादा शुल्क आकारणाऱ्या किंवा सेवा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या केंद्र चालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रत्येक आधार केंद्रावर शासनाने निश्चित केलेले अधिकृत सेवा शुल्क फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करावे, प्रत्येक व्यवहाराची अधिकृत पावती देणे सक्तीचे करावे आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीमुळे किनवट तालुक्यातील आधार केंद्रांच्या कार्यपद्धतीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून प्रशासन या प्रकरणाची दखल घेऊन चौकशी करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सायबर काईम, गुड टच बॅड टच व सुरक्षा यावर मार्गदर्शन

ओतूर : (स. गांवकरी)

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या आणासाहेब वाघीरे कॉलेज, चैतन्य विदयालय, गाडगे महाराज विदयालय, खामुंडी, धोलवड, पुष्पावती विदयालय डिंगोरे, ओतूर नं. १ कन्या शाळांमध्ये ओतूर पोलीसांकडुन जनजागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. सायबर सुरक्षे अंतर्गत ऑनलाईन फसवणुक, बनावट लिंक, ओ.टी.पी. बँक खात्याची गोपनीय माहिती, सोशल मिडीया फसवणुक, डिजीटल अटक यांसारख्या सायबर गुन्हयांपासुन बचाव करण्यसाठी घ्यावयाची दक्षता याबाबत विदयार्थ्यांना माहिती देण्यात आली आहे. तसेच सायबर गुन्हा घडल्यास १९३० या हेल्पलाईन नंबर व संबंधीत पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहान पोलीसांकडुन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे डायल



११२ आपत्कालीन सेवा, अंमली पदार्थ विरोधी जनजागृती तसेच सायबर सुरक्षा जनजागृती या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. डायल ११२ या आपत्कालीन सेवेचा वापर कोणत्या प्रसंगी करावा, आपत्कालीन परिस्थीतीत त्वरीत मदत कशी मिळवावी याबाबत माहिती देण्यात आली आहे. अंमली पदार्थांचे दुष्परीनाम, त्यांचे सेवन व तस्करी रोखण्यासाठी विदयार्थी व नागरीकांची भुमीका, संशयास्पद हालचालींची माहिती पोलीसांना देण्याचे महत्व या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

## तामसा पोलीस ठाण्याचा कारभार लपविण्यासाठी पत्रकारांना डावलले?

तामसा : (स. गांवकरी)

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलभ रोहन यांनी नुकतीच तामसा पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी केली. मात्र या महत्त्वाच्या तपासणीदरम्यान स्थानिक पत्रकारांना कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही किंवा संवादासाठी निमंत्रित करण्यात आले नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या या भूमिकेबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, "तामसा पोलीस ठाण्याचे पितळ उघड पडू नये म्हणून पत्रकारांना जाणीवपूर्वक डावलण्यात आले काय?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

वार्षिक तपासणी ही पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा, गुन्हेगारी नियंत्रणाचा, कायदा व सुव्यवस्थेचा तसेच प्रशासकीय कारभाराचा आढावा घेणारी महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. अशा वेळी माध्यमांशी संवाद साधून जनतेसमोर वस्तुस्थिती मांडली जाते. परंतु तामसा येथे तसे



**वार्षिक तपासणीनंतर चर्चांना उधाण**

घडले नाही. स्थानिक पातळीवर अवैध धंदे, गुटखा विक्री, वाहतूक नियमांचे उल्लंघन, वाढती गुन्हेगारी तसेच काही प्रलंबित प्रकरणांबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू असताना पत्रकारांना दूर ठेवण्याचा निर्णय संशय निर्माण करणारा ठरत आहे. जर सर्व काही सुरळीत असेल, तर माहिती देण्यास टाळाटाळ का करण्यात आली, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. काही जाणकारांच्या मते, पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळे पोलीस ठाण्यातील काही त्रुटी किंवा दुर्लक्षित बाबी समोर येण्याची शक्यता होती. त्यामुळेच माध्यम प्रतिनिधींना डावलण्यात आले असावे, अशी चर्चा परिसरात रंगत आहे. यामुळे पोलीस प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमे ही जनतेचा आवाज मानली जातात. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटीवेळी माध्यमांना विश्वासात घेऊन माहिती देणे अपेक्षित असते. तामसा पोलीस ठाण्यात मात्र याउलट चित्र दिसून आल्याने नागरिक आणि पत्रकारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. आता या प्रकरणी जिल्हा पोलीस प्रशासन स्पष्टीकरण देणार का, तसेच भविष्यात माध्यमांशी समन्वय ठेवणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संबंधित तामसा पोलीस ठाण्याच्या सपोनि शहदेव खेडकर यांच्यासोबत चर्चा केल्याने त्यांनी एस पी साहेबांचा प्रोटोकॉल असल्यामुळे पत्रकाराला निमंत्रित केले नाही. पण एसपी साहेबांच्या जनसंवाद एका गावाचा भेटीत पत्रकारांना निमंत्रण अपेक्षित होतं.

## 'शिवरत्न सभागृह' ' आता भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह' होणार

सोलापूर : (स. गांवकरी)



जिल्हा परिषद सोलापूरच्या स्थायी समितीची बैठक अध्यक्ष तथा सभापती दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात झाली. जिल्ह्याच्या विकासकामांना गती देतानाच गुणवत्ता, पारदर्शकता आणि नागरिकांना प्रभावी सेवा मिळण्यावर बैठकीत भर देण्यात आला. शिक्षण विभागाच्या आढाव्यात ११ तालुक्यांत ११ आदर्श शाळा उभारण्याचा निर्धार करण्यात आला. प्रत्येक तालुक्यात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागाच्या चर्चेत सर्पदंश व रेबीज प्रतिबंधक उपाययोजना, तसेच आरोग्य संस्थांमध्ये औषधांचा सुरक्षित साठा करण्यासाठी आवश्यक जागेची उपलब्धता या विषयांवर चर्चा झाली. ग्रामीण भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार मिळावेत, यासाठी आवश्यक नियोजन करण्यावर भर देण्यात आला. जिल्हा परिषदेच्या 'शिवरत्न सभागृहाला ' भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह' असे नामकरण करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सादर केला .

यावेळी जिल्हा परिषद अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. कामांची गुणवत्ता, निधीचा योग्य वापर आणि पारदर्शकता याबाबत संबंधित विभागांनी दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले. बैठकीच्या प्रारंभी माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर २५ जून २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले. शासनाकडून प्राप्त महत्त्वपूर्ण परिपत्रके व शासन निर्णयांचे वाचन करून नोंद घेण्यात आली.

बैठकीस उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समिती सभापती इंद्रजीत पवार, शिक्षण व आरोग्य समिती सभापती चेतनसिंह केदार, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, समाजकल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते, समिती सदस्य पृथ्वीराज माने, आदिनाथ देशमुख, रश्मी बागल, बालाजी नरुटे आणि रमेश श्रीमंत भांजे उपस्थित होते. प्रशासकीय स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) तथा सदस्य सचिव सूर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्ताधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## चिल्हेवाडी धरण ८७.८२ टक्के भरले

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील चिल्हेवाडी धरण दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजता ८७.८२ टक्के भरले असून, धरणातून मांडवी नदीपात्रात ४२०० क्यूसेकने पाण्याचा विसर्ग सुरू असून आज अखेर धरण क्षेत्रात ५२५ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याची माहिती कुकडी पाटबंधारे विभागाने दिली आहे. सध्या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे धरणात पाण्याची आवक वाढत आहे. पावसाची तीव्रता कायम राहिल्यास किंवा वाढल्यास तसेच धरणात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढल्यास नदीपात्रातील विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याचा इशारा पाटबंधारे विभागाने दिला आहे. यामुळे चिल्हेवाडी, आंबेगव्हाण, पाचघर, रोहोकडी तसेच मांडवी नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत नदीपात्रात उतरू नये. तसेच नदीकाठावरील



जनावरे, शेतीपंप, वाहने व इतर साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावे. सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी. संबंधित ग्रामपंचायती व इतर स्थानिक प्रशासनानेही नदीपात्रातील संभाव्य वाढीव विसर्गाबाबत नागरिकांना वेळोवेळी सूचना देऊन दक्षता घ्यावी असे आवाहन कुकडी पाटबंधारे विभागाकडून करण्यात आले आहे.



## 'नशामुक्त युवा अभियान' उत्साहात संपन्न

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स बेल्हे येथे भारत सरकारच्या 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत 'नशामुक्त युवा अभियान' कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करून निरोगी, सुदृढ व जबाबदार नागरिक घडविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमा साठी सुमन व्यसनमुक्ती व मानसिक आजार उपचार केंद्र,आळेफाटा येथील समुपदेशक प्रज्ञा प्रशांत सोमन जनसंपर्क अधिकारी ऋषी साबळे,आळेफाटा पोलीस ठाणे येथील महिला पोलीस हवालदार ज्योती दहिफळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल सचिन बोंबे, महिला पोलीस कॉन्स्टेबल कांचन रानडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उत्तम शेलार होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. शरद पारखे यांनी प्रास्ताविक करत नशामुक्त भारत अभियानाची उद्दिष्टे,युवकांची सामाजिक जबाबदारी आणि व्यसनमुक्त समाज घडविण्यात विद्यार्थ्यांची भूमिका या विषयी मार्गदर्शन केले. प्रा.सोमनाथ गाडेकर यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना नशामुक्तीची शपथ देऊन कोणत्याही प्रकारच्या व्यसना पासून दूर राहण्याचा तसेच इतरांनाही व्यसनमुक्त जीवना साठी प्रेरित करण्याचा संकल्प करून घेतला. यावेळी प्रमुख पाहुण्या प्रज्ञा प्रशांत सोमन यांनी व्यसनाधीनतेची कारणे, त्याचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक दुष्परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थीदशेत योग्य मित्रपरिवार सकारात्मक विचार, वेळेचे नियोजन आणि चांगले छंद जोपासल्यास व्यसनापासून दूर राहता येते, असे त्यांनी सांगितले. मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी गरज भासल्यास समुपदेशनघेण्याचे आवाहन केले. जनसंपर्क अधिकारी ऋषी साबळे यांनी सुमन व्यसनमुक्ती व मानसिक आजार उपचार केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. व्यसन ही व्यक्ती, कुटुंब आणि समाजासाठी गंभीर समस्या असून युवकांनी स्वतः व्यसन मुक्त राहून इतरांनाही या अभियानात सहभागी करून घ्यावे, असे त्यांनी सांगितले. महिला पोलीस हवालदार ज्योती दहिफळे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की,युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनाच्या आहारी न जाता कायद्याचे पालन करणारे, जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक बनणे ही काळाची गरज आहे.व्यसनामुळे अनेक गुन्हे घडतात,कौटुंबिक कलह वाढतो आणि समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतः व्यसना पासून दूर राहून आपल्या मित्रपरिवारालाही नशामुक्त जीवनाचा संदेश द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.पोलीस कॉन्स्टेबल सचिन बोंबे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यां ना सोशल मीडियाचा प्रभाव किंवा मित्रांच्या दबावामुळे कोणत्याही प्रकारच्या व्यसना ची सुरुवात करू नये, असा सल्ला दिला.व्यसनामुळे शैक्षणिक प्रगती, करिअर आणि कुटुंबाचे मोठे नुकसान होते.युवकांनी आपली ऊर्जा शिक्षण, क्रीडा, सामाजिक कार्य आणि राष्ट्रनिर्माणासाठी वापरावी. प्रत्येक विद्यार्थ्याने नशामुक्तीचा दूत बनून समाजात जनजागृती करावी, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. उत्तम शेलार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकरताना सांगितले की, शिक्षणा बरोबर च चारित्र्य, शिस्त आणि उत्तम संस्कार हीच विद्यार्थ्यांची खरी ओळख आहे. कोणत्याही प्रकारचे व्यसन व्यक्तीचे आरोग्य, शिक्षण,करिअर आणि कुटुंब उद्ध्वस्त करू शकते.त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने व्यसनमुक्त जीवन शैली स्वीकारून समाजासाठी आदर्श निर्माण करावा. अशा जनजागृतीपर कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास निश्चितच मदत होते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.गणेश बोरचटे यांनी केले. कार्यक्रमाच्या शे प्रा.ऋषिकेश कुऱ्हाडे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यां चे आभार मानले या कार्यक्रमा महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

# थोडक्यात पण महत्वाचे

## माळीझाप, अकोले संत सावता महाराज अखंड हरिनाम सप्ताह६७वा.

अकोले (स. गांवकरी) : माळीझाप अकोले येथिल संत सावता महाराज समाज मंदिर येथे संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथी निमित्त ६७ वा अखंड हरिनाम सप्ताह, ह.भ.प. विठ्ठलपंत महाराज गोंडे, श्रीमान महंत बाबाजी सेवादासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दिनांक ४ ऑगस्ट पासून सुरू होत आहे. योगी केशव बाबा चौधरी, ह.भ.प. दिपक महाराज देशमुख, ॲड.के.डी.धुमाळ, ह.भ.प. सुरेश महाराज भालेकर, रघुनाथ बाबा माने, ह.भ.प. चंद्रकांत महाराज चौधरी, एकनाथ पांडे यांचे हस्ते घटस्थापना व विना पूजन होणार आहे. ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ, ह.भ.प. पारधी सर, ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज वेलजाळी, ह.भ.प.राजेंद्र महाराज देशमुख, ह.भ.प. रतनबाई नवले, तसेच दैनंदिन कार्यक्रम, पहाटे ४ ते ६, काकडा भजन, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ वा गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, सायंकाळ (रात्री) ७ ते ९ श्री हरिकिर्तन, रात्री ११ ते पहाटे भजन व जागर. तसेच दैनंदिन किर्तनकार मंगळवार-दिनांक ४.रोजी. ह.भ.प. अनिल महाराज मंडलीक.निमोण, बुधवार-दि.५.रोजी ह.भ.प. नितीन महाराज गोडसे.मोग्रस, गुरुवार-दि.६. रोजी. ह.भ.प. कु. सायलीताई घोरवडकर. सिन्नर, शुक्रवार-दि.७. रोजी ह.भ.प. उषाताई महाराज आळंदीकर.आळंदी, शनिवार-दि.८.रोजी ह.भ.प. गोविंद महाराज करंजकर. अंबेजोगाई, रविवार-दि.९.रोजी ह.भ.प.आदिनाथ महाराज आंधळे पाथर्डी, सोमवार-दि.१०.रोजी ह.भ.प. मदन महाराज वर्पे. चिकणी, मंगळवार-दि.११. रोजी दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत संत सावता महाराजांचे प्रतिमेची सवाद्य मिरवणूक व सायंकाळी ५ ते ७ वाजता ह.भ.प राजेंद्र महाराज सदगीर मुथाळणे यांचे काल्याचे किर्तन होईल. तसेच किर्तन व महा प्रसादाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन माळीझाप अकोले ग्रामस्थांनी केले आहे.

## भोकर फाटा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत तिघे जखमी

अर्धापूर (स. गांवकरी) : "भोकर येथून नांदेड कडे चार तरुण दोन मोटरसायकल घेऊन जात होते. भोकर फाटा येथे दि.३ सोमवारी रोजी रात्री उशिरा दुचाकीला अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने तिघेजण जखमी झाले आहेत. या अपघातात नांदेड येथील सुमेध सावंत आणि सुनील काळे हे दोघे गंभीर जखमी झाले असून विशाल पंडित हा युवक किरकोळ जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच श्रीमद जगदगुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने जखमींना तातडीने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## गर्भवतीच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करा – आ. भीमराव केराम

किनवट (स. गांवकरी) : किनवट तालुक्यातील लोखंडवाडी येथील नऊ महिन्यांच्या आदिवासी गर्भवती महिलेच्या मृत्यूची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली आहे. या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दुर्गम आदिवासी भागात गर्भवती महिलांना वेळेवर उपचार, तज्ज्ञ डॉक्टर, रुग्णवाहिका व आवश्यक सुविधा उपलब्ध होत नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आरोग्य यंत्रणेवर प्रभावी नियंत्रण नसल्याचा आरोपही त्यांनी केला. मृत महिलेच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी तसेच किनवट–माहूरमधील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये डॉक्टर, परिचारिका, औषधसाठा, रुग्णवाहिका आणि प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून आरोग्य व्यवस्था सक्षम करावी, अशी मागणीही आमदार केराम यांनी केली.

## किनवटच्या ज्ञानेश चेरलेची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण कामगिरी



किनवट (स. गांवकरी) : किनवट तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरणारी उल्लेखनीय कामगिरी करत युवा तिरंदाज ज्ञानेश बालाजी चेरले याने बांगलादेशची राजधानी ढाका येथे झालेल्या 2026 WAA President's Challenge Cup and Joint Training Programme या आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत दमदार यश मिळवले आहे. रिकर्व्ह अंडर-18 पुरुष गटात ज्ञानेशने वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक (Gold Medal) पटकावत भारतासह किनवटचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. याच स्पर्धेत मिक्स टीम प्रकारात रौप्यपदक (Silver Medal) मिळवत ज्ञानेशने आपल्या उत्कृष्ट कामगिरीची आणखी एक छाप उमटवली. 30 जुलै ते 2 ऑगस्ट 2026 या कालावधीत ढाका येथे झालेल्या या स्पर्धेत विविध देशांतील अव्वल तिरंदाज सहभागी झाले होते. कठोर सराव, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ज्ञानेशने हे यश संपादन केले.

# अध्यक्षपदी समीर शाह, तर संकेत काजळे यांची सचिवपदी निवड

### पदग्रहण समारंभ उत्साहात साजरा; खजिनदारपदी मोहित मंडलिक




संगमनेर : (स. गांवकरी)

सामाजिक बांधिलकी जपत सेवा, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या ४३ व्या पदग्रहण समारंभाचा दिमाखदार सोहळा रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी समीर सुभाष शाह यांनी अध्यक्षपदाची, संकेत राजेंद्र काजळे यांनी सचिवपदाची तर मोहित नामदेव मंडलिक यांनी खजिनदारपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच नूतन बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचाही पदग्रहण सोहळा पार पडला. कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल (DG) जयेशभाई पटेल, आमदार सत्यजित तांबे, उद्योजक राजेशजी मालपाणी, सहाय्यक प्रांतपाल (AG) भागनाथ काटे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. यावेळी मागील वर्षाचे अध्यक्ष विश्वनाथ मालाणी व सचिव सौरभ म्हाळस यांनी नूतन पदाधिकाऱ्यांकडे पदाची सूत्रे सुपूर्द केली.

नूतन अध्यक्ष समीर शाह यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षातील सेवा प्रकल्पांची माहिती देताना सांगितले की, शैक्षणिक क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देत सोयी-सुविधांपासून वंचित असलेल्या शाळांमध्ये डिजिटल बोर्ड, ग्रीन बोर्ड, हॅन्डवॉश स्टेशन, विद्यार्थ्यांसाठी शूज, ग्रंथालयांसाठी पुस्तके आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच रोटरी आय केअर हॉस्पिटलच्या माध्यमातून डोळ्यांच्या आरोग्यासाठी विविध सेवा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रोटरीची सेवा पोहोचविण्यासाठी संपूर्ण टीम कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सामाजिक बांधिलकीचा आदर्श जपत अध्यक्ष समीर शाह व त्यांच्या परिवारातर्फे गरजू शालेय विद्यार्थ्यांसाठी ३०० बुटांच्या जोड्यांचे वितरण करण्यात आले, तर सचिव संकेत काजळे व त्यांच्या परिवारातर्फे रोटरी आय केअर हॉस्पिटलसाठी वॉशिंग मशीन भेट देण्यात आले. तसेच रोटरी क्लबमध्ये नव्याने सहभागी झालेल्या सदस्यांचेही स्वागत करून त्यांना रोटरी परिवारात सामील करण्यात आले. प्रमुख पाहुणे आमदार सत्यजित तांबे यांनी आपल्या भाषणात रोटरी आय केअर हॉस्पिटलसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच रोटरीने शहरातील एखादा महत्त्वाचा नागरी प्रश्न हाती घेऊन तो पूर्णपणे मार्गी लागेपर्यंत सातत्याने त्यावर काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठीही रोटरीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

उद्योजक राजेशजी मालपाणी यांनी रोटरीच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "रोटरी क्लब म्हणजे समाजातील गरज ओळखणारी संवेदनशील संस्था असून समस्यांवर प्रत्यक्ष उपाय अमलात आणणारी संघटित शक्ती आहे." रोटरीच्या या सेवायज्ञात मालपाणी परिवार यापुढेही नेहमीप्रमाणे सक्रिय सहभाग व सहकार्य देत राहील, असे त्यांनी सांगितले. प्रांतपाल जयेशभाई पटेल यांनी डिस्ट्रिक्टच्या आगामी वर्षातील महत्त्वाकांक्षी उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, डिस्ट्रिक्टमधील सर्व क्लबच्या माध्यमातून शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वर्षभरात २० हजारांहून अधिक मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया मोफत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दुर्गम भागातील शाळांमध्ये मुलींच्या आरोग्यावर विशेष भर देण्यात येणार असून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार स्वच्छतागृहांची उभारणी केली जाणार आहे. समाजातील उद्योजक, दानशूर व्यक्ती व नागरिकांनी रोटरीच्या सेवाकार्यात आर्थिक योगदान देऊन सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान नूतन पदाधिकाऱ्यांसह बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा परिचय करून देण्यात आला. शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, रोटरी सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनायक नागरे व भारतभूषण नावंदर यांनी केले, तर सचिव संकेत काजळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोकनेते ॲड. स्व. भिमराव (नाना) बडदे यांच्या जयंती सप्ताहानिमित्त आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले विनम्र अभिवादन



कोपरगाव : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे पहिले लोकसभा खासदार, लोकनेते ॲड. स्व. भिमराव (नाना) बडदे यांच्या जयंती सप्ताहानिमित्त स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर चौक, कोपरगाव येथे प्रतिमा पूजन, वृक्षारोपण व पालकत्व अभियानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विधानपरिषद सदस्य आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी उपस्थित राहून लोकनेते ॲड. स्व. भिमराव (नाना) बडदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.धर्मयोद्धा माजी खासदार ॲड.भिमराव (नाना) बडदे स्मृती प्रतिष्ठान, महाराष्ट्र प्रांत, शाखा कोपरगांव यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी सांगितले की, लोकनेते ॲड. भिमराव (नाना) बडदे यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. विशेषतः कोपरगावच्या पाणी प्रश्नावर त्यांनी सातत्याने आवाज उठवून सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. समाजहिताची त्यांची तळमळ, विकासाची दूरदृष्टी आणि जनसेवेची निष्ठा ही आजच्या पिढीसाठी आदर्शवत असून त्यांचा कार्यवारसा पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारा आहे. कार्यक्रमात जयंती सप्ताहानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच पालकत्व अभियानाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत समाजातील गरजू घटकांच्या विकासासाठी योगदान देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, दिलीप दारुणकर, बाळासाहेब नरोडे, सागर बडदे, दत्तु पगारे, कैलास मंजुळ, दिलीप घोडके सर, ॲड.जयंत जोशी, सुशांत घोडके,योगेश वाणी,संतोष गंगवाल,सतीशअण्णा काकडे, दिपकराव साळुंके,रविंद्र निकम, सतीश चव्हाण, रोहिदास पाखरे, किशोर मांडगे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते ॲड. स्व. भिमराव (नाना) बडदे यांच्या विचारांचा आणि जनसेवेच्या आदर्शाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

# डॉ. मुकुंदा खंदारे सेवानिवृत्त



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचेअण्णा साहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील वाणिज्य विभाग व संशोधन केंद्राचे समन्वयक प्राध्यापक डॉ.मुकिंदा बळीरा म खंदारे हे शासकीय नियमा प्रमाणे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली. यानिमित्त महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला सेवानिवृत्ती सत्कार समारंभ अत्यंत भावपूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शारीरिक शिक्षण संचालक डॉ उमेशराज पनेरु यांनीआपल्या प्रस्ताविकपर मनोगतात डॉ. खंदारे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेताना सांगितले की,"डॉ. खंदारे हे बहुआयामी व्यक्ति मत्त्व असून वाणिज्य विभागा च्या प्रगतीमध्ये त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.त्यांनी विद्यार्थीकेंद्री अध्यापन, संशोधन,शिस्तबद्धकार्यपद्धती आणि प्रामाणिक सेवेमुळे महाविद्यालयात आदर्श प्राध्यापक म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आणि सहकारी प्राध्यापकांना प्रेरणा मिळाली असून त्यांच्या कार्याचा ठसा कायम स्मरणात राहील." कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. खंदारे यांच्या दीर्घ शैक्षणिक सेवेचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, "डॉ. खंदारे यांनी वाणिज्य विभागाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व प्रशासकीय प्रगतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# लोकमान्य टिळक अण्णा भाऊ साठे यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान आजही प्रेरणादायी : प्रा. राजीव सावंत

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स,बेल्हे येथे क्रांतिकारक विचारवंत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या प्रसंगी समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लोकमान्य टिळकांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान व अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सामाजिक परिवर्तनातील प्रभाव यावर सविस्तर विवेचन केले.प्रा. राजीव सावंत म्हणाले की, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख शिल्पकार होते. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" हा त्यांचा घोष भारतीय जनतेच्या मनात स्वातंत्र्याची जाज्वल्य प्रेरणा निर्माण करणारा ठरला. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाच्यामाध्यमा तून त्यांनी समाजात राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजवली. 'केसरी' आणि 'मराठा' या वृत्तपत्रांद्वारे त्यांनी ब्रिटिश सत्तेच्या अन्यायाविरुद्ध निर्भीड आवाज उठविला. शिक्षण,राष्ट्रभक्ती,सामाजिक जागृती आणि लोकसंघटन यांची सांगड घालत त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली.त्यांच्या विचारांमधून देशभक्ती, स्वाभिमान व कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा आजही प्रत्येक भारतीयाला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. याचबरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आढावा घेताना प्रा.सावंत म्हणाले की,अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कथा,कादंबऱ्या,पोवाडे, लावण्या व शाहिरीच्यामाध्यमा तून समाजातील वंचित, श्रमिक,उपेक्षित घटकांचे वास्तव प्रभावीपणे मांडले.

# बारामतीमधील ४६ रूग्णांना मिळाली नवी दृष्टी !



नारायणगाव : (स. गांवकरी)

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती (सणसर) येथील विनोदभाऊ थोरात मित्र परिवार व पुणे जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्र, सणसर, ता. इंदापूर, जि.पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनच्या मोहन ठुसे नेत्र रूग्णालय, नारायणगांव यांच्या विशेष सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर गुरूवार दि. ३०/०७/२०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, सणसर येथे आयोजित केले होते. या शिबिरामध्ये एकूण ४९१ रूग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ६१ रूग्णांना मोतीबिंदू झाल्याचे निर्दशनास आले. त्यापैकी ४६ रूग्णांवर नारायणगांव येथे अत्याधुनिक लेसर पध्दतीने मोफत मोतबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या.या शिबिरामध्ये आलेल्या रूग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया, प्रवास, नाष्टा, जेवण, औषधे, काळा चष्मा इ. सुविधा पूर्णतः मोफत देण्यात आलेल्या आहेत. शिबिराच्या आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, परिचारिका, आशा सेविका यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या शिबिरातील सर्व रूग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया डॉ. प्रिया हरकल, डॉ. पल्लवी कुटे, डॉ. भाग्यश्री नागापुरे, डॉ. पुजा चव्हाण, डॉ. सिध्दी भिसे यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनचे मोहन ठुसे नेत्र रूग्णालय या संस्थेचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त स्व. डॉ. मनोहर कृष्ण डोळे यांनी १९८२ साली ग्रामीण भागातील गरीब व वनवासी नेत्ररूग्णांसाठी डोळयाचे हॉस्पिटल नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे येथे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये सुरू केले. पुणे व लगतच्या पाच जिल्हयांमध्ये त्या काळामध्ये आरोग्याची कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नसताना केवळ ही गरज लक्षात घेऊन आपले दिवंगत मित्र कै मोहन ठुसे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे सेवाकार्य सुरू केले. ग्रामीण भागामध्ये हजारो मोफत नेत्रशिबिरे घेऊन त्यामधून आजपर्यंत सुमारे अडीच लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. त्याचबरोबर रक्तपेढी, माधव नेत्रपेढी, डोळयाचा अत्याधुनिक फिरता दवाखाना, मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रशिक्षण केंद्र, मोफत नर्सिंग कोर्स, अथर्व नेत्रालय व हायटेक लेसर सेंटर इ. प्रकल्पांच्या माध्यमातून आज ४४ वर्षानंतर संस्थेचे वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. 'अत्याधुनिक तंत्रज्ञान, उच्चशिक्षित डॉक्टर यामुळे येणाऱ्या प्रत्येक रूग्णास समाधानकारक दृष्टी देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. ग्रामीण तसेच शहरी भागातील नेत्रशिबीरांमार्फत गरीब तसेच गरजू, वयोवृध्द लोकांसाठी नेत्रसुविधा पुरविण्यात आमच्या हॉस्पिटलला प्रथम दर्जाचे मानांकन मिळाले आहे. या हॉस्पिटलमध्ये कॉम्पयुटराईज्ड नेत्र तपासणी, अत्याधुनिक लेसर मशीनद्वारे विनाटाका, विनाभुल, विनापटटी मोतीबिंदूची फेको शस्त्रक्रिया, बुबळावरील पडद्याची शस्त्रक्रिया, डोळयाच्या मागील पडद्याची (रेटिना) तपासणी व शस्त्रक्रिया, काचबिंदू उपचार व शस्त्रक्रिया, चष्मा नंबर कायमचा घालविण्याची लॅसिक लेसर शस्त्रक्रिया इ. सुविधा उपलब्ध आहेत. अत्याधुनिक सेवा सुविधा, अल्पदरात समाजापर्यंत पोहचविणे हा मुख्य उद्देश ठेऊन आम्ही नेत्रसेवेचे कार्य करीत आहोत' अशी माहिती संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी दिली.




डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
प्रदेश सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
संपादक : दैनिक समर्थ गांवकरी
संपादक : AVP NEWS Channel
संपादक : समर्थ गांवकरी NEWS Channel
संचालक : अकोले प्रा.वि.शे.सह.पतसंस्था मर्या; अकोले
मोबा.९४२३३८८५०८ / ९४२३४६७२७२



# 265 दिव्यांगांना मोफत कृत्रिम हात-पाय

**कळवण, जि. नाशिक : (स. गांवकरी)**




भारत विकास परिषद, नाशिक शहर आणि दिव्यांग केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL) यांच्या सीएसआर निधीतून कळवण येथेआयोजित करण्यात आलेले मोफत दिव्यांग शिबिर मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या वातावरणात संपन्न झाले. या शिबिरात 265 दिव्यांग बांधवांनी सहभाग नोंदवला असून त्यांना ₹50 हजार ते ₹75 हजार बाजारमूल्याचे अत्याधुनिक मॉड्युलर कृत्रिम हात व पाय पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.शिबिराचे उद्घाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारतीताई पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, भारत विकास परिषदेचे पदाधिकारी, दिव्यांग केंद्र पुणेचे तज्ज्ञ, डॉक्टर, तांत्रिक सहकारी,सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना माजी मंत्री डॉ.भारतीताई पवार म्हणाल्या की, "समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याच्या भावनेतून राबविण्यात येणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहेत. दिव्यांग बांधवांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी कृत्रिम अवयव उपलब्ध करून देणे ही खरी समाजसेवा आहे. या सेवाकार्यात योगदान देणाऱ्या सर्व आयोजक, सहकारी आणि दात्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार."या शिबिरात उपस्थित लाभार्थ्यांची तज्ज्ञ डॉक्टर व तांत्रिक सहकाऱ्यांकडून सविस्तर तपासणी करून कृत्रिम हात-पायांसाठी मोजमाप घेण्यात आले. पुढील महिन्यात सर्व पात्र लाभार्थ्यांना अत्याधुनिक मॉड्युलर कृत्रिम अवयवांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.भारत विकास परिषदेचे अध्यक्ष दीपक कुलकर्णी, माननीय हेमंत गोखले, परिषदेचे सर्व पदाधिकारी, दिव्यांग केंद्र पुणेचे प्रमुख, स्वयंसेवक आणि तांत्रिक सहकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, नगराध्यक्ष कौतिक महाराज पगार, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष दीपक खैरनार व इतर पदाधिकारी उपस्थित होत रोटरी क्लब ऑफ कळवणचे पदाधिकारी ,वाणी समाज मंगल कार्यालय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी, विविध सामाजिक संस्था आणि नागरिकांचेही मोलाचे सहकार्य लाभले.कळवण परिसरात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आलेल्या या दिव्यांग शिबिरामुळे अनेक दिव्यांग बांधवांच्या जीवनात नवी आशा निर्माण झाली आहे.



ठाणे, दिवा : ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीत रविवारी सकाळी एक सुन्न करणारी घटना घडली. अवघ्या १८ वर्षीय तरुणी कामावर जाते सांगत घराबाहेर पडली होती. दिवा-कोपर दरम्यान लोकलच्या धडकेत तिचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. परिसरात हळहळ व्यक्त झाली, मात्र शवविच्छेदनात समोर आलेल्या माहितीने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे.

## थोडक्यात बातम्या...



### वघई तालुका पंचायत कार्यालयात दिवसा देखील विज दिवे सुरू

डांग, गुजरात **(स. गांवकरी)** : डांग जिल्ह्यातील वघई तालुका पंचायत कार्यालयाच्या परिसरात भर दिवसा बाहेरील विज दिवे सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आश्चर्य आणि नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे राज्य सरकार आणि वीज वितरण विभागाकडून वीज बचतीबाबत जनजागृती केली जात असताना, दुसरीकडे सरकारी कार्यालयातच विजेचा अनावश्यक वापर होत असल्याचे आरोप केले जात आहेत.दिवसा पुरेसा सूर्यप्रकाश असतानाही कार्यालयाच्या परिसरातील बाहेरील विज दिवे सुरू असल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सरकारी वीज आणि करदात्यांच्या पैशांचा विनाकारण अपव्यय होत आहे. हे दिवे बंद ठेवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत. सरकारी कार्यालयांमध्येच वीज बचतीच्या नियमांचे पालन होत नसेल, तर सामान्य नागरिकांकडून वीज बचतीची अपेक्षा कशी ठेवायची, अशी चर्चाही नागरिकांमध्ये सुरू आहे. आता या प्रकरणाची तालुका पंचायत प्रशासनाकडून दखल घेतली जाईल का, संबंधित अधिकाऱ्यांकडून चौकशी करून जबाबदारांवर कारवाई होईल का, की ही निष्काळजीपणा अशीच सुरू राहणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### कळम डोंगरावरील BSNL टॉवर ११ दिवसांपासून बंद



डांग, गुजरात **(स. गांवकरी)** : डांग जिल्ह्यातील दुर्गम भागात असलेल्या कळम डोंगरावरील BSNL टॉवर गेल्या ११ दिवसांपासून अज्ञात कारणांमुळे पूर्णपणे बंद असल्याने परिसरातील आठ गावे बाह्य जगाशी संपर्कविहीन झाली आहेत. मोबाईल नेटवर्क आणि दूरसंचार सेवा पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे सती, वांगण, वांवदा, कुतरनाच्या, गोलष्टा, सुंदा, खापरी आणि कासवदहाड या गावांतील हजारो ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. डिजिटल युगातही या दुर्गम गावांतील नागरिकांना मोबाईल आणि इंटरनेट सेवांपासून वंचित राहावे लागत असून दैनंदिन व्यवहारांपासून शासकीय सेवांपर्यंत सर्वच कामांवर परिणाम झाला आहे. आपत्कालीन सेवाही पूर्णपणे विस्कळीत झाल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.आकस्मिक आजारपण किंवा अपघाताच्या वेळी १०८ रुग्णवाहिका, १०० पोलिस हेल्पलाइन तसेच ११२ आपत्कालीन सेवांशी संपर्क साधता येत नसल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. नेटवर्क नसल्यामुळे गर्भवती महिलांना वेळेवर रुग्णालयात किंवा आरोग्य केंद्रात पोहोचविणे शक्य होत नसून काही ठिकाणी गावातच प्रसूती करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे माता व नवजात बालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, योग्य वेळी उपचार न मिळाल्याने काही रुग्णांचा मृत्यू झाल्याचेही गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सलग ११ दिवस आठही गावे संपर्काबाहेर असतानाही प्रशासन किंवा BSNL विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी करण्याची तसदी घेतलेली नाही. प्रशासनाच्या या निष्क्रियतेविरोधात ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नागरिकांचे जनजीवन आणि आरोग्य धोक्यात आणणारी ही परिस्थिती तातडीने दूर करून कळम डोंगरावरील BSNL टॉवर दुरुस्त करून मोबाईल नेटवर्क सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

### कर्मच्यारी राहूल खांडेकर यांचे आत्मदहन करण्याचे निवेदन

नांदेड जिल्हा **(स. गांवकरी)** : एम एस ई बी चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता एस एन कांबळे यांच्या आडकाटी धोरणामुळे कर्मच्यारी राहूल खांडेकर यांचे आत्मदहन करण्याचे निवेदन कार्यकारी अभियंता शहरी विभाग यांना दि ३१ जुलै रोजी दिलेआहे . वाजेगाव, चौफाळा, देगलूर नाका, (चौक), या ठिकाणी OT NO/EE/URDN/HR/00704 DT:-02/02/2026 नुसार कार्यरत असून राहुल हरिभाऊ खांडेकर क का स या पदावर शाखा सदरील पत्रानुसार मला बी अँड आर विभागाशी निगडित कामे देण्यात आले आहे, दिलेले चारही शाखा कार्यालयाचे कामे मी प्रामाणिकपणे काम करत आहे तरीसुद्धा माझी जुलै 2026 ची मासिक पगार नाही झाली नाही याचे काय कारण असे अतिरिक्त कार्यकारी अभियंता एस एन कांबळे हे दि ६ जुलै रोजी कार्यालयात आले असता तुझी या महिन्याची पगार मी काढत नाहीं अनुपस्थिती पाठवतो असे राहुल खांडेकर यांना धमकावले याचे कारण राहूल खांडेकर यांनी विचारले असता कांबळे म्हणाले माझी मर्जी मी काहीही करेन असे बोलले असता खांडेकर यांनी विनंती केली असता त्यांनी दोन हजार रुपये ची खंडणीची मागणी केली.

## कुंटूंर पोलिसांची कारवाई देशी दारूच्या बाटल्यांसह दोघे जेरबंद

**नायगाव : (स. गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील देगाव फाटा येथे अण्णाभाऊ साठे जयंतीच्या बंदोबस्तादरम्यान अवैध दारू वाहतूक उघड; ७७ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त नायगाव तालुक्यातील कुंटुर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल भोसले यांनी काही दिवसांच्या रजेवर गेले असता अवैध देशी व विदेशी दारू माफियांनी बेसुमार दारू उघडं पणे चालू केले होते विशाल भोसले यांनी ज्याईन होताच दारू माफियांना हावालत दाखवले आहे

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या पार्श्वभूमीवर कुंटूंर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या गस्तीदरम्यान पोलिसांनी अवैध देशी दारू वाहतुकीवर धडक कारवाई करत दोघांना रंगेहात पकडले. या कारवाईत देशी दारूच्या ९६ बाटल्या व मोटारसायकलसह एकूण ७७ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. असल्याची माहिती सपोनि विषाल भोसले यांनी दिली आहे. दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सपोनि विशाल भोसले हे पोलीस हेडकॉन्स्टेबल कंधारे व पोलीस कर्मचारी हंबर्डे यांच्यासह कुंटूंर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना देगाव फाटा येथे संशयास्पदरीत्या येणारी एमएच २६ सीए ८९६४ क्रमांकाची काळ्या रंगाची लाल पट्टे असलेली पल्सर मोटारसायकल अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मोटारसायकलवरील खाकी रंगाच्या पोत्यामध्ये देशी भिंगरी संत्रा या ब्रँडच्या ९६ दारूच्या बाटल्या आढळून आल्या. या दारूची किंमत ७ हजार ६८० रुपये, तर मोटारसायकलची किंमत ७० हजार रुपये असून एकूण ७७ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी रामेश्वर गुणवंतराव गुडपे वय ३० वर्ष व बालाजी गोविंदराव गुडपे वय २८ वर्ष हे दोघेही रा. देगाव, ता. नायगाव यांच्याविरुद्ध अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करून चोरट्या विक्रीचा उद्देश बाळगल्याप्रकरणी कुंटूंर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.पण दारू बंदी अधिकारी या सर्व बाबींकडे दुर्लक्ष का कारीत आहे यांचे कारनं समजलेच नाही.

## खड्यांमुळेच अपघात! वेरूळे येथे भीषण अपघातात विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू

**कनाशी : (स. गांवकरी)**




कळवण तालुक्यातील वेरूळे परिसरात आज झालेल्या भीषण अपघातात हेमराज परसराम गावित या विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. तर इतर दोन विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, MH-18 AJ-8258 क्रमांकाचे वाहन दळवटहून कनाशीकडे जात असताना समोरून येणाऱ्या स्कूटीला जोरदार धडकले. धडक इतकी भीषण होती की स्कूटीवरील तिन्ही विद्यार्थी फेकले गेले. त्यात हेमराज गावित याचा जागीच मृत्यू झाला. स्थानिकांचा आणि काँग्रेसचा आरोप आहे की, रस्त्यावर पडले मोठे खड्डे हेच या अपघाताला कारणीभूत आहेत. गेल्या 6 महिन्यातच नव्याने केलेले रस्ते उखडले असून, प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. काँग्रेसचे तालुका अध्यक्ष के.के. गांगुर्डे यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले, गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. फक्त टक्केवारीसाठी निकृष्ट दर्जाचे काम केले जाते. आज त्यामुळेच एका निष्पाप विद्यार्थ्याचा बळी गेला आहे. 6 महिनेही रस्ते टिकत नाहीत. याला जबाबदार नेमके कोण? लोकप्रतिनिधी की PWD? शासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. नाहीतर आम्ही रस्त्यावर उतरू.



## डिंभा धरण शंभर टक्के भरले; विवेकदादा वळसे पाटील यांच्या हस्ते जलपूजन!

**आंबेगाव : (स. गांवकरी)**

उत्तर पुणे जिल्ह्याच्या जलसंपदेचा कणा मानले जाणारे डिंभा धरण यंदा पूर्ण क्षमतेने भरले असून धरणातील पाणीसाठा जवळपास १०० टक्क्यांवर पोहोचला आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या महत्त्वाच्या धरणाने पुन्हा एकदा हजारो शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांना नवे बळ दिले आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. या ऐतिहासिक आणि आनंददायी क्षणाचे औचित्य साधत जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेकदादा वळसे पाटील यांच्या हस्ते विधिवत जलपूजन करण्यात आले. यावेळी रमेश खिलारी, कैलास बुवा काळे, निलेश टीमकर, निलेश थोरात, अजय आवटे, प्रकाश घोलप, संजय गवारी, सुषमाताई शिंदे, सरपंच प्रसाद कराळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. डिंभा धरण हे आंबेगाव, शिरूर तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील काही भागासाठी जीवनवाहिनी मानले जाते. या धरणाच्या पाण्यावर हजारो एकर शेती अवलंबून असून ऊस, भाजीपाला, फळबागा तसेच विविध नगदी पिकांसाठी हे धरण वरदान ठरले आहे. याशिवाय अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोतही डिंभा धरणच आहे. यंदा समाधानकारक पावसामुळे धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने आगामी रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी सिंचनाची मोठी हमी मिळाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत असून कृषी उत्पादनातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ...तर गटबाजी आणि राजकारण बाजुला ठेवावे लागणार

**सोलापूर : (स. गांवकरी)**

सोलापूर शहराला जर बदलयाचे असेल तर गटबाजी आणि राजकारण बाजुला ठेवावे लागणार आहे असे. मत नागरिकांनी व्यक्त केले पालकमंत्री जयकुमार गोरे आणि शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यात सुरू असलेल्या सोलापूर मधील राड्या वर नागरिकांनी आपली मते मांडताना सोलापूर चा विकास

करण्यासाठी आणि सोलापूर शहराला बदलण्यासाठी राजकारण आणि राजकीय गटबाजी बाजूला ठेवूननेते मंडळींनी काम करावे असा सल्लाही सोलापूर कर नागरिकांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना दिला.

अरे लाजा बाळगा रे थोडं तरी!': असेही काही नागरिक म्हणाले सोलापूरकरांच्या विश्वासाचा असा 'टक्केवारी'त सौदा? ककरता का असा सवाल करत लोकप्रतिनिधींनो, उत्तर काय देणार? असे विचारले.

सोलापूरकरांनी अतिशय विश्वासाने आणि आपल्या शहराचे भविष्य बदलेल या आशेने सत्ताधाऱ्यांच्या हातात सत्तेची किल्ली दिली. जनतेने आपले मत दिले, कर भरला आणि लोकप्रतिनिधींना सन्मानाने खुर्चीवर बसवले. पण आज परिस्थिती काय आहे?



जनतेच्या पैशांवर फिरणाऱ्या एसी गाड्या, आलिशान एसी ऑफिसेस, डोक्यावरचे लाल-दिवे आणि ताठ मानेने समाजात मिरवणारे नगरसेवक... या सगळ्यामागे सोलापूरकरांचा घाम गाळून भरलेला टॅक्स आहे, याचा विसर या लोकप्रतिनिधींना पडलाय का? असा जळजळीत प्रश्न आज सामान्य सोलापूरकर विचारत आहे.

केंद्रात सत्ता यांचीच, राज्यात सत्ता यांचीच... तरीही सोलापूरच्या नशिबी काय? तर फक्त पक्षांतर्गत गटबाजी आहे, एकमेकांवर होणारे चिखलफेक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'टक्केवारी' चे राजकारण! असेही नागरिकांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले. नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतरची सुरुवातीची वर्षे फक्त गटबाजीत आणि टक्केवारी सेट करण्यात घालवायची, आणि निवडणुकीचे शेवटचे वर्ष आले की, जणू स्वतःच्या बापाच्या पैशातून काम करत असल्याचा आव आणायचा... हेच सोलापूरचे दुर्दैव ठरले आहे का? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. पाच वर्षे आपापसात भांडायचे, जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करायचे आणि निवडणुका जवळ आल्या की पुन्हा: हिंदू-मुस्लीम समीकरणांचे राजकारण करायचे.

राज्य आणि केंद्रातील बड्या नेत्यांच्या सभा भरवून खोट्या आश्वासनांची खैरात करायची.

आणि शेवटी सामान्य सोलापूरकरांना पुन्हा मुर्ख बनवून निघून जायचे!

पण प्रश्न असा उपस्थित होतो की— आपण सजग सोलापूरकर म्हणून कधी विचार करणार आहोत? आपण किती काळ मुर्ख बनत राहणार आहोत?

आपल्याच कुटुंबाला काय तोंड दाखवणार? लोकप्रतिनिधी असणे ही केवळ एक पदवी किंवा कमाईचे साधन नाही, ती जनतेने दिलेली एक मोठी जबाबदारी आहे. आज टक्केवारीच्या मागे पळणाऱ्या नगरसेवकांनी स्वतःच्या मनाला विचारले पाहिजे—

उद्या स्वतःच्या वॉर्डात फिरताना मान अभिमानाने वर असणार की लाजाने खाली?

आपल्या घरातील आई-वडील, पत्नी आणि लहान मुलांसमोर उभे राहताना स्वतःच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटेल का?

एखाद्या नागरिकाने गल्लीत ताठ मानेने म्हटले पाहिजे की, "हा नगरसेवक माझा आहे!" असा विश्वास निर्माण करण्यात हे लोकप्रतिनिधी पूर्णपणे अपयशी ठरत आहेत.

सोलापूर शहराला बदलायचे असेल, तर राजकारण आणि गटबाजी बाजूला ठेवावीच लागेल. शहराच्या विकासासाठी पक्षभेद विसरून एकत्र येण्याची धमक दाखवावी लागेल.

सोलापूरकरांना आश्वासनांचे गाजर नकोय, तर 'बदल' हवाय! आणि हा बदल घडवून आणण्यासाठी कोणत्याही बजेटपेक्षा "प्रबळ इच्छाशक्तीची" गरज आहे.

आता तरी सोलापूरकरांसाठी काहीतरी चांगले करा... नाहीतर इतिहास तुम्हाला कधीच माफ करणार नाही! असेही नागरिकांनी म्हटले आहे.

## विकासकामे पूर्ण : पण ठेकेदार उद्ध्वस्त! ४० हजार कोटींची थकबाकी

### टक्केवारीचे ओझे आणि शासनाच्या उदासीनतेने राज्यातील ठेकेदार आत्महत्येच्या उंबरठ्यावर

**कळवण नाशिक : (स. गांवकरी)**



राज्याच्या विकासाची प्रत्येक वीट, प्रत्येक रस्ता, प्रत्येक पूल, प्रत्येक शाळा, प्रत्येक अंगणवाडी आणि प्रत्येक जलयोजना उभी करणारा ठेकेदार आज स्वतःच्या घराचा पाया वाचवण्यासाठी धडपडत आहे. विकासकामांची गाजावाजा करणारे सरकार, उद्घाटनांचे श्रेय घेणारे लोकप्रतिनिधी आणि फाईलवर सही करणारे अधिकारी यांच्यामध्ये खरा विकास घडवणारा ठेकेदार मात्र आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला आहे. राज्यातील ठेकेदारांची तब्बल ४० हजार कोटी रुपयांची देणी गेल्या तीन वर्षांपासून थकली आहेत. हजारो कोटींची विकासकामे पूर्ण करूनही त्याचे पैसे न मिळाल्याने राज्यातील हजारो ठेकेदार अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहेत. शासनाने वेळेवर निधी न दिल्याने अनेकांची घरे उध्वस्त झाली, जमिनी विकल्या गेल्या, दागिने गहाण पडले आणि अनेकांना सावकारांच्या दारात जावे लागले. सरकार मोठ्या दिमाखात नवीन योजना जाहीर करते, भूमिपूजन आणि उद्घाटने करते, पण ती कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदार स्वतःचे सर्वस्व पणाला लावतात. बँका, खासगी वित्तसंस्था, सावकार यांच्याकडून जादा व्याजाने कर्ज घेऊन कामे पूर्ण केली जातात. मात्र काम पूर्ण झाल्यानंतरही देयके वेळेवर मिळत नसल्याने ठेकेदारांची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. आज अनेक ठेकेदारांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी ठेवलेले पैसे खर्च केले आहेत. अनेकांनी मुलींच्या लग्नासाठी राखून ठेवलेले दागिने विकले आहेत. आई-वडिलांच्या औषधोपचारासाठी पैसे नाहीत. घर चालवणे कठीण झाले आहे. काहींनी तर शासनाची कामे पूर्ण करण्यासाठी स्वतःची शेती, घरे आणि मालमत्ता विकून टाकली आहे. काम निकृष्ट झाले की सर्वप्रथम ठेकेदारावर कारवाईची घोषणा होते. लोकप्रतिनिधी, मंत्री आणि अधिकारी पत्रकार परिषदेत कठोर भूमिका घेतात. मात्र त्या कामाच्या मंजुरीपासून ते अंतिम बिलापर्यंत अनेक स्तरांवर कथित टक्केवारीची चर्चा होत असते, हा आरोप ठेकेदार सातत्याने करत आहेत. जर काम सुरू करण्यापूर्वीच विविध स्तरांवर आर्थिक भार वाढत असेल, आणि निधी वेळेवर मिळत नसेल आणि व्याजाचा डोंगर वाढत असेल, तर दर्जेदार काम करण्यासाठी आवश्यक आर्थिक क्षमता ठेकेदाराकडे उरणार कशी? हा प्रश्न शासनाने आणि प्रशासनाने आत्मपरीक्षण करून सोडवण्याची गरज आहे. विकासकामांचे श्रेय घेण्यासाठी लोकप्रतिनिधी नेहमी पुढे असतात. मात्र विकासकामे पूर्ण करणाऱ्या ठेकेदारांच्या अडचणींकडे किती जणांनी गांभीर्याने लक्ष दिले ?आज हजारो ठेकेदार आर्थिक संकटात सापडले असताना किती खासदार, आमदार किंवा मंत्र्यांनी शासनाकडे ठामपणे हा विषय मांडला?हा प्रश्न आता जनतेतूनही विचारला जाऊ लागला आहे.ठेकेदारांनी जर कामे थांबवली तर विकास ठप्प होईल राज्यातील सर्व ठेकेदारांनी एकत्रितपणे कामे बंद करण्याचा निर्णय घेतला, तर शासनाची विकासयंत्रणा अक्षरशः ठप्प होईल. रस्ते, पूल, शाळा, आरोग्य केंद्रे, जलजीवन मिशन, सिंचन योजना, सार्वजनिक बांधकामे यांचा वेग थांबेल. विकासकामे नसतील तर लोकप्रतिनिधींनाही जनतेसमोर उत्तर देणे कठीण होईल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

ARROTE Dental Clinic
smile more..live more..

डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ
# गांवकरी
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
बुधवार दि. ०५ ऑगस्ट २०२६


दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

आवृत्ती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : ३०६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'सक्षम कौशल्य जनगणना' कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या 'सक्षम कौशल्य जनगणना' या अभिनव उपक्रमाच्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुंबई उपनगरचे पालकमंत्री ड. आशिष शेलार, सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री मंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबई उपनगर चे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यावेळी उपस्थित होते.



'सक्षम कौशल्य जनगणना' हा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला देशातील पहिला एआय-सक्षम हायपरलोकल कौशल्य जनगणना उपक्रम आहे. रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधींसाठी सविस्तर कौशल्य डेटा तयार करण्याचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५९,८२४ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून ४४,९८२ उमेदवारांची नोंद, १,०१८ नियोक्ते आणि ५२ प्रशिक्षण संस्थांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. या सर्वेक्षणातून बेरोजगार, कौशल्यवृद्धी इच्छुक, स्वयंरोजगारासाठी इच्छुक; तसेच गृहिणींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती संकलित करण्यात आली आहे.

'सक्षम कौशल्य जनगणना'मुळे उपजीविका आणि रोजगारनिर्मितीला नवी दिशा

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या 'सक्षम कौशल्य जनगणना' या अभिनव उपक्रमामुळे रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार क्षेत्रात महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येत आहेत. या जनगणनेतून रोजगारक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यातील तफावत स्पष्ट झाली असून, भविष्यातील नियोजनासाठी भक्कम पाया तयार झाला आहे.

जनगणनेदरम्यान सर्वेक्षण करण्यात आलेल्या जवळपास ९८ टक्के नागरिकांकडे औपचारिक कौशल्य प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले. रोजगारक्षमता आणि कार्यबलाच्या औपचारिकीकरणातील ही मोठी दरी भरून काढण्यासाठी 'सक्षम' उपक्रम प्रभावी ठरत आहे. सर्वेक्षणानंतर ३२ हजारांहून अधिक उमेदवारांना वैयक्तिकृत करिअर मार्गदर्शन देण्यात येणार आहे. बाजारपेठेच्या गरजांनुसार २२ हजारांहून अधिक उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणाशी जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय ५ हजार ८०० हून अधिक बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधींशी जोडण्याची प्रक्रिया सुरू असून, १ हजार ६९० हून अधिक उमेदवारांशी नियोक्त्यांनी मुलाखती व भरतीसाठी थेट संपर्क साधला आहे.

स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ४ हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना संरचित प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि व्यवसाय सल्ला दिला जाणार आहे; तसेच ६ हजारांहून अधिक गृहिणी, दिव्यांग व्यक्ती आणि समाजातील वंचित घटकांना औपचारिक उपजीविका, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे.

## राज्यात 'एसआयआर' मोहिमेला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यात सुरू असलेल्या विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षण म्हणजेच 'एसआयआर' मोहिमेला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात सरासरी ७५ टक्के एसआयआर प्रक्रीया पूर्ण झाली असून मुंबई, ठाणेसारख्या भागातील डिजिटायझेशनचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास आहे. या पार्श्वभूमीवर या प्रक्रीयेला मुदतवाढ देण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. त्यानुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे अवर सचिव संदीप कुमार यांनी मंगळवारी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठवून या सुधारित वेळापत्रकाची घोषणा केली. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आलेल्या विनंतीची दखल घेत आयोगाने ही मुदतवाढ आणि नवीन वेळापत्रक मंजूर केले आहे. उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अचूक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार, १७ ऑगस्टपर्यंत बीएलओ घराघरांत जाऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण करतील. त्याच दिवशी मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण आणि पुनर्रचना करण्याचे काम पार पडेल. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी मसुदा मतदार यादी जाहीर केली जाईल. या मसुदा यादीवर नागरिकांना, राजकीय पक्षांना आपले दावे आणि हरकती २३ सप्टेंबरपर्यंत नोंदवता येतील.

प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकतींची सुनावणी घेऊन ते निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर या कालावधीत पूर्ण केली जाईल. यानंतर सर्व आवश्यक दुरुस्त्या, नव्या मतदारांची नोंदणी आणि दुबार अथवा मृत मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया पूर्ण करून २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

## साथीच्या आजारांसोबत कोविड आणि एन१एन१च्या रुग्णांतही झालीय वाढ

**मुंबई** : मुंबईत साथीच्या आजारांनी पुन्हा डोके वर काढले असून मलेरिया, डेंग्यू, लेप्टोस्पायरेसीस, गॅस्ट्रो याबरोबरच कोविड आणि एन१ एन १ या आजारांच्या रुग्णांतही दुप्पट वाढ दियून येत आहे. मागील महिन्यात कोविडचे जिथे २७ रुग्ण होते, तिथे जुलै महिन्यांत या रुग्णांची संख्या ५८ आढळून आली आहे, तर एच१ एन१चे जिथे मागील महिन्यात ५८ रुग्ण होते, तिथे या जुलै महिन्यातील या आजारांचे एकूण रुग्ण १०५ असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे साथीच्या आजारांबरोबरच कोविड आणि एच१एन१च्या रुग्णांमध्ये होणारी वाढही मुंबईकरांना आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश देणारी ठरत आहे. ( उजतखऊ-१९) मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पावसाळाजन्य आजारांची आणि रुग्णांची माहिती जाहीर केली जाते. या आजारांच्या रुग्णांच्या आकडेवारीनुसार मलेरिया, डेंग्यू, लेप्टोस्पायरेसीस या आजारांमध्ये मागील महिन्याच्या तुलनेत दुप्पट वाढ झालेली पाहायला मिळत आहे. महापालिका आरोग्य विभागाने ही या आजाराची वाढती संख्या पाहता चिंता व्यक्त केली



असली तरी आरोग्य विभागामार्फत सर्व पालिका रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांच्या परिसरात मलेरिया, डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी नियमित सवेक्षण, अळीनाशक फवारणी, आणि पाणी साचणाऱ्या ठिकाणांचा नायनाट करून शून्य डास प्रजनन मोहिम प्रभावीपणे राबवली जात आहे. रुग्णालयाच्या परिसरात डासांची उत्पत्ती रोखून तिचे येणारे रुग्ण आणि त्याचे नातेवाईक आणि डॉक्टरांना मलेरिया व डेंग्यूच्या आजारांपासून वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार १ ते ३१ जुलै २०२६ या एक महिन्याच्या कालावधीत ६ लाख ५९ हजार ३९६ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले, तर १२३ आरोग्य शिबिर घेण्यात आले.

गॅस्ट्रोचे सांताक्रुझ, घाटकोपर, वांद्रे परिसरात रुग्ण मुंबईमध्ये जून महिन्यात गॅस्ट्रोचे ६०३ रुग्ण होते, तर त्यातुलने जुलै महिन्यांत ८५१ रुग्ण आढळून आले आहेत.

## पुणेकरांनो सावध व्हा! मुठा नदीने धारण केले रौद्ररूप; धरण साखळी पूर्ण भरली, सखल भागात सतर्कतेचा इशारा

**पुणे** : पुणे शहर आणि परिसरासह संपूर्ण महाराष्ट्रात सध्या मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि सातारा जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असतानाच, पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरण साखळी क्षेत्रातही तुफान पाऊस झाला आहे. यामुळे या भागातील चारही प्रमुख धरणे १००% पूर्ण क्षमतेने भरली आहेत. धरणांमध्ये पाण्याचा प्रचंड साठा जमा झाल्यामुळे खडकवासला धरणाचे दरवाजे उघडून मुठा नदीपात्रात २९ हजार क्यूसेक वेगाने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. नदीची पातळी वेगाने वाढत असल्याने नदीकाठच्या नागरिकांना आणि पुणेकरांना



प्रशासनाकडून सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

धरणसाखळीत २८ टीएमसी पाणीसाठा जमा! : पुणे शहराची तहान भागवणाऱ्या खडकवासला धरण साखळीत टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चार प्रमुख धरणांचा समावेश होतो.

## आता यूपीआय सशुल्क होणार ? लोकसभेत सादर झालेल्या विधेयकातील तरतुदी समजून घ्या

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मंगळवार ४ ऑगस्ट २०२६ रोजी लोकसभेत एक विधेयक सादर केले. या विधेयकातील तरतुदींमुळे केंद्र सरकारला यूपीआयसह सर्व प्रकारच्या डिजिटल पेमेंटवर मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) लागू करण्याचे अधिकार मिळतील. लोकसभेत सादर झालेल्या या नव्या विधेयकाचे नाव 'कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६' असे आहे. या विधेयकात अनेक कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी तरतुदी आहेत. पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स अधिनियम २००७ च्या कलम १०अ मध्ये सुधारणा करण्याचाही प्रस्ताव यात आहे.





'कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६' याचे कायद्यात रुपांतर झाले तर णझख सशुल्क होणार का असा प्रश्न अनेकांना पडला आहे. तर या प्रश्नाचे उत्तर आता अतिशय सोप्या शब्दात समजून घ्या. 'कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६' याचे कायद्यात रुपांतर झाले तर UPI वर लगेचच MDR आकारला जाणार नाही. पण UPI वर MDR आकारण्यासाठी कायदेशीर चौकट तयार होणार आहे. यामुळे भविष्यात कोणत्या डिजिटल पेमेंटवर शुल्क लागू करावे आणि कोणत्या डिजिटल पेमेंटवर शुल्क लागू करू नये याचा निर्णय घेणे सरकारला शक्य होणार आहे.

## आरोग्य सेवक (पुरुष) पदावरून ११ कर्मचाऱ्यांना आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदावर पदोन्नती; मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते आदेश वितरण

ठाणे (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (पुरुष) या पदावरील ११ कर्मचाऱ्यांना आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदावर पदोन्नती देऊन समुपदेशनानंतर पदस्थापना आदेशांचे वितरण आज, दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा परिषद सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, अधिक जबाबदारीने सेवा करण्याची संधी आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण, तत्पर आणि संवेदनशील आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येकाने आपल्या नव्या पदाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी. शासनाच्या विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवेला अधिक सक्षम बनविण्यासाठी सर्वांनी समर्पित भावनेने कार्य करावे.

पदोन्नती प्राप्त कर्मचाऱ्यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त करत जिल्हा परिषद प्रशासनाचे आभार मानले. नव्या जबाबदारीचे भान ठेवून ग्रामीण भागातील



नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

## नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी क्रांतीदिनी महामार्गावर चक्काजाम

संगमनेर (समर्थ गांवकरी)

पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी आता निर्णायक लढा उभारण्याची वेळ आली असून, ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता पुणे-नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. हे कोणत्याही पक्षाचे किंवा एखाद्या राजकीय नेत्याचे आंदोलन नसून, भावी पिढ्यांच्या हितासाठी उभारलेले जनआंदोलन आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार सत्यजित तांबे यांनी केले.

'शंभर वर्षांतून एकदाच अशी संधी मिळते'

आमदार तांबे म्हणाले, रेल्वेसारखे मोठे विकास प्रकल्प शंभर वर्षांतून एकदाच साकार होतात. आज हा प्रकल्प आपल्या भागातून निघून गेला, तर पुढील शंभर-दोनशे वर्षांत अशी रेल्वे पुन्हा या भागात येईल, याची कोणतीही खात्री नाही. किंबहुना, अशी संधी पुन्हा मिळणारही नाही. त्यामुळे हा प्रकल्प आपल्या भागातूनच मार्गी लागला पाहिजे.

'संघर्ष आता अंतिम टप्प्यात'

पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गासाठीचा संघर्ष आता अंतिम टप्प्यात पोहोचला असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, एका बाजूला केंद्रीय मंत्र्यांकडून रेल्वे प्रकल्प रद्द झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र दुसऱ्या बाजूला या भागातील जनतेच्या अपेक्षा अजूनही कायम आहेत. सरकार जनभावनेचा आदर करून नफा-तोट्याचा विचार बाजूला ठेवत व्यवहार्य मार्ग काढेल, अशी आमची अपेक्षा आहे.

केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी निर्णायक आंदोलन

केंद्र सरकारला जाग आणण्यासाठी आणि या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी संपूर्ण पुणे-नाशिक महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून सर्वसामान्य जनतेचे आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या आंदोलनात सहभागी होऊन आपली ताकद दाखवावी, असे आवाहन त्यांनी केले.

वाहतुकीचा वाढता ताण; रेल्वेच ठरेल पर्याय



सध्या पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत असून, दोन-अडीच तासांचा प्रवास करण्यासाठी सहा-सहा तास खर्च करावे लागत आहेत. रस्त्यांची अवस्थाही अनेक ठिकाणी खराब झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे तांबे यांनी सांगितले.

मधल्या शहरांसह पुणे-नाशिकलाही मोठा दिलासा

या परिसरातील हजारो युवक-युवती नोकरी, शिक्षण, उद्योग-व्यवसाय आणि इतर कामांसाठी पुणे व नाशिक येथे ये-जा करतात. त्यामुळे दोन्ही शहरांवरही लोकसंख्येचा आणि वाहतुकीचा मोठा



ताण वाढत आहे. सरळ रेल्वेमार्ग झाल्यास सिन्नर, संगमनेर, खेड, नारायणगाव, जुन्नर, मंचर, चाकण यांसह पुणे आणि नाशिक या दोन्ही शहरांनाही मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'क्रांतीदिनी रस्त्यावर उतरूया'

आता क्रांती करण्याची वेळ आली आहे. ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता जिथे शक्य असेल, तेथे नागरिकांनी रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन करावे. एकाच दिवशी आणि एकाच वेळी संपूर्ण पुणे-नाशिक महामार्ग ठप्प करून केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाईल, असे तांबे यांनी स्पष्ट केले.

### 'हे आंदोलन भावी पिढ्यांसाठी'

जेव्हा जनता एकत्र येते, तेव्हा सरकारला निर्णय घ्यावाच लागतो. त्यामुळे हे आंदोलन कोणत्याही पक्षाच्या बॅनरखाली किंवा कोणत्याही नेत्याच्या नेतृत्वाखाली होणार नाही. सामान्य माणूस म्हणून प्रत्येकाने यात सहभागी व्हावे. हे आंदोलन कुणा एका व्यक्तीचे नसून भावी पिढ्यांच्या विकासासाठी आजची पिढी उभारत असलेले ऐतिहासिक जनआंदोलन आहे.

-आ.सत्यजित तांबे

### सर्वपक्षीय नेते सहभागी होणार

आमदार सत्यजित तांबे यांनी नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी क्रांतीदिने रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली असून यामध्ये अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार राजाभाऊ वाजे खासदार डॉ अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार निलेश लंके, आमदार शरद दादा सोनवणे, आमदार बाबाजी काळे, आमदार विलास लांडे, आमदार महेश लांडगे, माजी मंत्री माणिकराव कोकाटे, मा आ. डॉ. सुधीर तांबे, डॉ जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध मान्यवर सहभागी होणार आहेत

# वाढदिवस दरवर्षी येईल... पण दादांचा तो सकाळचा फोन पुन्हा कधीच येणार नाही!

## स्व. अजितदादांच्या आठवणीने आमदार आशुतोष काळे गहिवरले; हजारो कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केल्या मनातील भावना

**कोपरगांव (समर्थ गांवकरी)**

माझ्या प्रत्येक वाढदिवशी सकाळी साडेसहा वाजता अजितदादांचा शुभेच्छांचा फोन यायचाच. अनेक वर्षांची ती प्रेमाची परंपरा होती. पण यंदा तो फोन येणार नाही, ही जाणीव मनाला असह्य वेदना देणारी आहे. वाढदिवस दरवर्षी येईल,पण अजितदादा पुन्हा कधीच परत येणार नाहीत अशा शब्दांत आमदार आशुतोष काळे यांनी भावना व्यक्त करताच सभागृहातील वातावरण क्षणभर स्तब्ध झाले.

कोपरगाव येथील कृष्णाई बॅन्क्वेट हॉलमध्ये आमदार आशुतोष काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शुभेच्छा सोहळ्यासाठी कोपरगाव मतदारसंघातून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली होती. शुभेच्छा स्वीकारण्यापूर्वी उपस्थितांशी संवाद साधताना स्व. अजितदादांच्या आठवणींनी आमदार काळे यांचा कंठ दाटून आला. यावर्षी वाढदिवस साजरा करण्याची मनापासून इच्छा नव्हती. आपल्या सर्वांचे लाडके नेते स्व. अजितदादा आपल्याला सोडून जाऊन सहा महिने झाले, पण मन अजूनही ते वास्तव स्वीकारू शकलेले नाही. आजही वाटते, दादा कुठेतरी भेटतील, पुन्हा एकदा प्रेमाने विचारपूस करतील. ही आशा मनातून जात नाही, असे ते भावूक स्वरात म्हणाले.

ते पुढे म्हणाले, कार्यकर्त्यांचा उत्साह, जनतेचे प्रेम आणि आशीर्वाद पाहता वाढदिवस साजरा करावा की नाही, अशा द्विधा मनःस्थितीत होतो. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहाचा मान राखण्यासाठी आणि जनतेचे आशीर्वाद स्वीकारण्यासाठी अत्यंत साधेपणाने वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. एका बाजूला जनतेचे अपार प्रेम आणि विश्वास आहे; पण दुसऱ्या बाजूला दादा नसल्याची पोकळी मनाला सतत अस्वस्थ करते. त्यांच्या शुभेच्छांशिवाय साजरा झालेला हा पहिला वाढदिवस आयुष्यभर वेदना देत राहील. आजही प्रत्येक क्षणी त्यांची आठवण येते, असे सांगताना त्यांचा आवाज भरून आला.

**अजितदादांच्या शुभेच्छामुळे वाढदिवसाचा आनंद द्विगुणीत होत होता परंतु हा दादांशिवायचा पहिला वाढदिवस असल्याचे सांगतांच स्व.अजितदादांच्या आठवणीने आमदार आशुतोष काळे यांचा कंठ दाटून आला. वाढदिवस दरवर्षी येईल, पण अजितदादा परत येणार नाहीत, आणि अजितदादांसारखा माणूस पुन्हा होणार नाही. या शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले आणि उपस्थित हजारो कार्यकर्ते आणि नागरिक देखील भावूक झाले.**



स्व.अजितदादांच्या कार्याचा उल्लेख करताना आमदार काळे म्हणाले, दादांनी आम्हाला माणुसकीची वाट दाखवली. जनतेची सेवा हेच जीवनाचे ध्येय असल्याचे शिकवले. संकटांशी दोन हात करत खंबीरपणे पुढे कसे चालायचे, याची प्रेरणा दिली. आज ते आपल्यात नसले, तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार आणि त्यांचे कार्य माझ्या प्रत्येक पावलावर मार्गदर्शक म्हणून राहणार असल्याचे त्यानी सांगितले.यावेळी हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

# श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचा ६१वा वर्धापन दिन उत्साहात

## श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची ६१ वर्षाची परंपरा गौरवास्पद : शिरीष रायते

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

मुलींना उत्तम शिक्षण व संस्कार मिळावे, मुलींची शैक्षणिक प्रगती व्हावी.या उद्देशाने ही शाळा सुरू करण्यात आली आहे.या शाळेतील मुलींनी केलेली प्रगती कौतुकास्पद आहे.

शाळेतील सर्व शिक्षक अत्यंत तळमळीने ज्ञानदानाचे कार्य करीत असल्याने विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत यश मिळत आहे.श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची ६१ वर्षाची परंपरा गौरवास्पद आहे.असे प्रतिपादन स्कूल कमिटी सदस्य प्रा.शिरीष रायते यांनी केले आहे.

हिंदसेवा मंडळ संचलित श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालय चा ६१वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले.तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समिती सदस्य प्रा. शिरीष रायते, प्रमुख पाहुणे सेवा निवृत्त प्रा.अविनाश मुंडके,हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा,भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी,शालेय समिती सदस्य अशोक कानडे, मुख्याध्यापिका रोहिणी फळे, बि.यु.कुलकर्णी,बबन धनवडे, नितीन केने,सुखदेव नागरे,वृषाल एकबोटे, सौ.वैशाली दारवेकर, सौ. अनघा देवचक्के,माहेश्वरी कुलकर्णी आदी उपस्थित होते.

अजित बोरा यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून शाळेच्या नाव लौकिकात भर घालावी.असे सांगितले.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, हिंदसेवा मंडळ ही शतकोत्तर वाटचाल करणारी संस्था आहे.तसेच श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाने यशस्वीपणे ६१ वर्षे पूर्ण केली आहेत.विद्यार्थ्यांनी शिक्षक व गुरुजनवर्गांचा आदर बाळगावा. चांगले शिक्षण घेऊन शाळेचे नाव उज्वल करावे.

मुंडके सर म्हणाले,वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारी ही मुलींची शाळा आहे.मुलींची शैक्षणिक व सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी विशेष लक्ष दिले जाते.शाळेतील विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे. मोबाईलच्या दुष्परिणामामुळे अनेकांचे मनोबल कमी होत आहे.पर्यावरणाचे रक्षण करावे.व प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावण्याचा प्रयत्न करावा.

अशोक कानडे म्हणाले, श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची प्रगती कौतुकास्पद आहे.हिंद सेवा मंडळाने मुलींच्या कलागुणांचा विकास व्हावा.या हेतूने मुलींची शाळा सुरू केली आहे.

# आजच्या डिजिटल युगात मराठी साहित्यात उच्च दर्जाचे संशोधन होणे काळाची गरज : प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**




मराठी भाषेचे संवर्धन आणि संशोधनाचा वारसा पुढे नेणाऱ्या गुणवंत संशोधकांचा गौरव हा संपूर्ण समाजासाठी अभिमानास्पद क्षण असतो. मराठी भाषा आणि साहित्यात उल्लेखनीय संशोधन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राकडून विद्यार्थ्यांच्या विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते संशोधक विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, शाल, पेन देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा,ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,अजित बोरा,डॉ.पारस कोठारी,प्रा.ज्योतीताई कुलकर्णी यांनी यशवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

डॉ.वैदही गायकवाड- महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांचा सांस्कृतिक अभ्यास,डॉ.संगीता फासाटे- साठोत्तरी ग्रामीण कवितेचा गेय आविष्कार : एक अभ्यास,डॉ.मंदा हाडवळे -२००० ते २०२० मधील कलावंतांच्या निवडक आत्मचरित्रांचा अभ्यास (साहित्य, चित्रपट,नाट्य,नृत्य,संगीत,चित्रकला या क्षेत्रांच्या संदर्भात), डॉ.सुनीता लोंढे-'अनुबंध' नियतकालिकातील कथांचा विवेचक अभ्यास, डॉ. सुनीता दुधाट-निवडक मराठी लेखिकांच्या ललित गद्याचा आदिबंधात्मक अभ्यास,डॉ रूपाली ढमढेरे-दीनमित्र' मधील अग्रलेखांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास, डॉ.राहुल शेलार -द.मा.मिरासदार व शंकर पाटील यांच्या ग्रामीण व विनोदी कथात्मक साहित्याचे स्वरूप आणि चिकित्सा, डॉ.सोनाली शिंदे-गोपाळ गणेश आगरकर विषयक मराठीतील चरित्रपर लेखनाचा अभ्यास अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण संशोधन केले आहे.

# किसान इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियान' उत्साहात संपन्न

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

सध्याच्या धावपळीच्या युगात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी आणि समाज चिंतेच्या गर्तेत सापडला आहे. या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी आणि समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पारनेर येथील किसान इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रातर्फे 'दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियानांतर्गत' विशेष व्यसनमुक्ती प्रतिज्ञा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.



ब्रह्माकुमारी साधना दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे हे होते. याशिवाय राम भाई, पत्रकार भगवान गायकवाड आदी मान्यवर विशेष उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मिळून एकसंधपणे व्यसनमुक्त समाज घडविण्याचा दृढ संकल्प केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी सांगितले की, आजच्या काळात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे विद्यार्थी, युवक तसेच संपूर्ण समाजावर अत्यंत गंभीर परिणाम होत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच व्यसनाधीनतेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, त्यांनी मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा स्वीकार करावा आणि एका निरोगी समाजाची निर्मिती व्हावी, याच उद्देशाने प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयातर्फे हे देशव्यापी महाअभियान राबवले जात आहे.

आजचा भारत हा प्रचंड ताणतणाव आणि मानसिक अस्वस्थतेमुळे त्रस्त झाला आहे. या तणावातून बाहेर पडण्यासाठी अनेक व्यक्ती चुकीच्या मार्गाने व्यसनांच्या आहारी जातात; परंतु व्यसन केल्यामुळे टेन्शन कधीही कमी होत नाही, तर उलट ते आणखी वाढते, असा महत्त्वपूर्ण संदेश दीदींनी दिला.

# बालसाहित्य हे कोणत्याही भाषेच्या समृद्धीचा पाया असते : प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

१९९० नंतरच्या मराठी बालकादंबऱ्यांचा विशेष अभ्यास करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागात तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या डॉ.अर्चना क्षीरसागर यांचा पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ.माहेश्वरी गावित यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



क्षीरसागर या सारडा महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत.हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी त्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, बालसाहित्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या,परंतु संशोधनाच्या पातळीवर काहीशा उपेक्षित राहिलेल्या विषयावर त्यांनी हे सखोल संशोधन पूर्ण केले आहे. १९९० नंतरच्या जागतिकीकरण, डिजिटलायझेशन आणि बदलत्या सामाजिक वातावरणाचा मराठी बालकादंबऱ्यांवर झालेला परिणाम या संशोधनात प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आला आहे.

१९९० नंतरच्या बालकादंबऱ्यांमधील विषयांचे बदलते स्वरूप, बालमन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा बालसाहित्यावर झालेला प्रभाव, बालसाहित्यातील आधुनिक भाषिक प्रयोग व शैली या सर्व घटकांचा अभ्यास या संशोधनात समाविष्ट आहे. बालसाहित्य हे कोणत्याही भाषेच्या समृद्धीचा पाया असते. १९९० नंतरच्या बालकादंबऱ्यांचा वेध घेऊन त्यांनी या क्षेत्रातील महत्त्वाची पोकळी भरून काढली आहे. त्यांचे हे संशोधन भविष्यातील अभ्यासकांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरेल.

सत्कारमूर्ती डॉ. अर्चना क्षीरसागर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,आजच्या डिजिटल युगात मुलांची वाचनसंस्कृती जपायची असेल तर आधुनिक बालसाहित्याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे होते. या पदवीमुळे माझ्या संशोधनाला योग्य ती पोचपावती मिळाली आहे.

# आगळी वेगळी गुरुपौर्णिमा: श्रीक्षेत्र नारायणपूर

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

परम पूज्य श्री श्री नारायण महाराज श्री क्षेत्र नारायणपूर तालुका पुरंदर जिल्हा पुणे यांचे आशीर्वादाने व परमपूज्य सद्गुरु टेंबे स्वामी यांचे अधिपत्याखाली भरत नाना क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाने गुरुपौर्णिमा उत्सव प्रचंड लोक समुदायाच्या उपस्थितीत संपूर्ण भारतातील दत्त भाविकांच्या उपस्थितीत आनंदाने श्री क्षेत्र नारायणपूर येथे साजरा झाला. या कार्यक्रमात महर्षी व्यास म्हणजेच देवांचे गुरु यांचे पादुका पूजन श्री श्री श्री नारायण महाराजांच्या पादुका पूजनाने संपन्न झाले परमपूज्य श्री श्री नारायण महाराजांनी मानव जोड प्रकल्प सुरू केला .माणसाला माणूस जोडण्याचे प्रकल्प म्हणजे मानव जोड अभियान सुरू केले .सुरुवातीला लोकांना हा वेडेपणा वाटला. अण्णा महाराजांनी प्रथम भारताची पूर्ण परिक्रमा करून अभ्यास करून मानव अशांत आहे. दुःखी आहे ,कष्टी आहे, भांबावलेला आहे. त्याला कोणीतरी दिशा दिली पाहिजे. तहान लागली आहे तर पाणी दिले पाहिजे .त्यासाठी परमेश्वराला मध्यस्थी करून, खरे ज्ञान देऊन त्याला सावरले पाहिजे. यासाठी श्री दत्त महाराजांचे भारताच्या चार टोकाला चार श्री दत्त धामांची निर्मिती केली .भव्य दिव्य मंदिरात दत्तमूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली. पहिले दत्तधाम मध्य प्रदेश ,दुसरे दत्तधाम तामिळनाडू, कन्याकुमारी येथे तर तिसरे दत्तधाम कलकत्ता पश्चिम बंगाल येथे तर चौथे दत्तधाम उत्तरांचल राज्यात स्थापन केले. यामुळे महाराष्ट्राच्या माणसाला मध्यप्रदेशात जाता आले .मध्य प्रदेशातला माणूस दत्त महाराजांच्या सानिध्यात महाराष्ट्रात आला .तोच माणूस कन्याकुमारी तामिळनाडूला गेला. तोच माणूस पश्चिम बंगालला गेला. तेथील मानव उत्तरांचल येथे गेला. ही सर्व राज्यातील भाविक माणसांची मांदियाळी महाराष्ट्रात श्री क्षेत्र नारायणपूरला दत्त जयंती गुरुपौर्णिमा तसेच महिन्याच्या पौर्णिमेला एकत्र येऊन विचारांची तसेच शिक्षणाची माणुसकीची देवाण-घेवाण करून शांत होऊन प्रशांत होऊ लागली .परांची सेवा हा मुख्य धागा अण्णांनी त्यासाठी वापरला .आपल्या माणसांची आपण सेवा करतो .पण ज्यांचा संबंध नाही त्यांची सेवा करणे ही खरी सेवा. हा ज्ञानाचा विचार त्यांनी लोकांमध्ये रुजवला आपल्या माणसाच्या सेवेतूनच पाहता पाहता भारत जोड प्रकल्प तयार झाला .माणसातला माणूस जागा झाला. विचार करायला लागला. दुःख विसरून शांत झाला. या सर्वांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमा अतिशय आनंदात यावर्षीही साजरी झाली. गुरुपौर्णिमेसाठी भारताच्या कानाकोपऱ्यातून भाविक आले त्यांची सर्वांची राहण्याची ,भोजनाची व्यवस्था केली होती. पहाटे कार्यक्रमाला रुद्राने सुरुवात झाली रुद्रानंतर भजन व भजनोत्तर आरती तसेच आरती नंतर पौर्णिमेचे होम हवन त्यानंतर परमपूज्य श्री श्री श्री नारायण महाराज अण्णा यांच्या पुतळ्याच्या अनावरण झाले. पुतळा इतका सुंदर केला गेला की साक्षात अण्णा महाराजच प्रकट झाले की काय असे वाटून भाविकांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. त्याच पादुका पूजन अण्णा महाराजांचे पादुका पूजन झाले. हे पादुका पूजन अण्णांच्या सांगण्याप्रमाणे सर्वसामान्य दोन यात्रेकरूंना भरतनानांनी बोलावून घेऊन त्यांच्या हस्ते केले. कारण परमपूज्य अण्णा महाराज नेहमी सांगत असत की यात्रेकरू हेच दत्त महाराज आहे .त्यांची




सेवा म्हणजे दत्त महाराजांची सेवा म्हणून यात्रेकरू दत्त आहेत .यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले भजन होऊन टेंबे स्वामींनी सर्व भाविकांना मार्गदर्शन केले. नामस्मरण करा .नीतीने वागा .माणसांना माणूस जोडा. दत्त महाराज आण्णा महाराज आपणास काही सुद्धा कमी पडू देणार नाही.


## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि फौजदारी/जन्म नोंद/९३/२०२६ अकोले दि.०४/०८/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. रासने सुधीर निवृत्ती रा. अकोले**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतः रासने सुधीर निवृत्ती यांचा जन्म दि. ३०/०७/१९६२ रोजी अकोले** येथे झाला असल्याची नोंद **मुख्याधिकारी नगरपंचायत अकोले**, ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा संदर्भिय अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. रासने सुधीर निवृत्ती रा. अकोले**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः रासने सुधीर निवृत्ती यांचा जन्म दि. ३०/०७/१९६२ रोजी अकोले** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद **मुख्याधिकारी नगरपंचायत अकोले**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्यानिशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०४/०८/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींकडून सीमेवरील सैनिकांना २५०० राख्याभेट



संगमनेर (समर्थ गांवकरी)

ऊन ,वारा ,पाऊस अंगावर झेलत देशवासीयांच्या रक्षणासाठी सीमेवर कर्तव्य बजावत असलेल्या भारतीय सैन्यातील सर्व जवानांकरता सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी २५०० राख्या बनवून पाठवल्या आहेत.

जय हिंद महिला मंच, स्वराज्य कल्याण संस्था व सह्याद्री विद्यालय संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे विद्यार्थिनींनी सैनिकांसाठी राख्या बनवल्या व त्या आज पाठवण्यात आल्या आहे. माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संगमनेर तालुक्यातील माजी सैनिकांनी स्थापन केलेल्या स्वराज्य कल्याण संस्थेच्या सदस्यांकडे या राख्या सुपूर्त करण्यात आल्या.

याप्रसंगी सौ दुर्गा ताई तांबे, विद्यालयाचे मुख्याध्यापक एसएम खेमनर, स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष मेजर प्रकाश कोटकर, कॅप्टन भिकाजी भागवत, प्यारा कमांडो लक्ष्मणराव ढोले, सुभेदार मेजर गिरीश एरंडे ,कॅप्टन अनिल पावसे, सुभेदार भानुदास पोखरकर ,सुभेदार रघुनाथ पवार, सुभेदार गोविंद खरडे ,रामनाथ ढोले, सुभेदार मेजर गुंजाळ मतकर, सुभेदार प्रकाश पवार, सुभेदार संभाजी पाचारणे व जय हिंद महिला मंचच्या सदस्या सौ सुषमा भालेराव, सौ सुनीता ताई कांदळकर राधिकाताई डॉलर व परदेशी ताई उपस्थित होत्या.

तर सह्याद्री महाविद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका सुरेखा दिघे पर्यवेक्षक किशोर देशमुख अण्णासाहेब दिघे, मिरा ढोले, अर्चना घोरपडे, गीताराम शेळके एकनाथ भागवत ,वरपे मॅडम यांसह मान्यवर उपस्थित होते.

### रमाबाई कलचुरी यांच्या वाढदिवसा निम्मित विविध कार्यक्रम नगरमध्ये संपन्न



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे तत्कालीन अध्यक्ष व बाबांचे रहिवासी मंडळीमधील शेवटच्या उर्वरित सदस्य, आणि बाबावर वीस-खंड चरित्र प्रभु मेहेर लिहिलेले, मेहेरबाबा असंख्य साहित्यिक कामे,लेखक केलेले कै भाऊ कलचुरी यांच्या धर्मपत्नी रमाबाई कलचुरी यांचा ९५ वा वाढदिवसा निम्मित विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

रमाबाई कलचुरी या लग्नाअगोदर पासून बाबाच्या भक्त होत्या,लग्नानंतर अनेक वर्षे त्यांना भाऊसाहेबांच्या बरोबर मेहेरबाबा ची सेवा करण्याची संधी मिळाली मेहेरबाबाना पाहिलेले,बरोबर राहिलेले व मंडळीतील मोजकेच लोक सध्या आहेत त्यात रमाबाई आहेत गेली ७० वर्षे त्या बाबाच्या कार्याचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

वाढिवसानिम्मित आयोजित कार्यक्रमात मेहेरबाबाच्या, भाऊसाहेब कलचुरींच्या अनेक आठवणी सांगितल्या गेल्या , यावेळी संगीत, गाणे भजनांचा कार्यक्रम झाला.मेहेरबाबाची आरती व प्रार्थना करण्यात आली तर केक कटिंग केल्यावर अनेकांनी रमाबाईनी शतायुषी व्हा म्हणून शुभेछया दिल्या.

### स्वच्छता ही सर्व समाजघटकांची जबाबदारी-स्वच्छतादूत अद्वैता शिरसाट

**बाबुजी आव्हाड महाविद्यालयात स्वच्छता अभियान मार्गदर्शन**




पाथर्डी (समर्थ गांवकरी)

स्वच्छता ही सर्वात महत्वाची सवय असून स्वच्छता व आरोग्य यांचा परस्परसंबंध आहे. स्वच्छ व्यक्ती अनेक संसर्गजन्य आजारांशी लढू शकते व त्यांना टाळू शकते. स्वच्छतेमुळे शारीरिक, मानसिक तसेच अध्यात्मिक आरोग्य सुधारण्यास मदत होते त्यामुळे घर परिसर व देशाची स्वच्छता ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जर्मनी येथील स्वच्छतादूत अद्वैता शिरसाट यांनी केले. त्या येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आयोजित स्वच्छता अभियान मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे तर व्यासपीठावर विश्वस्त कुणाल आव्हाड, प्रतीक्षा आव्हाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ अरुण राख, पर्यवेक्षक प्रा सलीम शेख, प्रा. शेखर ससाणे उपस्थित होते.

अद्वैता शिरसाट पुढे म्हणाल्या, भारत आणि जर्मनीमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत खूप मोठा फरक असून परदेशामध्ये भारताचे वर्णन अस्वच्छ देश असे केले जाते. हे चित्र आपल्याला बदलावयाचे असून यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वत: पासून सुरुवात करणे गरजेचे आहे.

# पारनेर नगरपंचायतीच्या निकृष्ट विकासकामांविरोधात महिलांचा संताप; प्रशासनाला विचारला जाब

## सुनिताताई सोबले यांच्या नेतृत्वाखाली ५० हून अधिक महिलांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर नगरपंचायत हद्दीतील सोबलेवाडी परिसरातील विविध प्रलंबित नागरी समस्यांबाबत संतप्त झालेल्या महिलांनी सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी नगरपंचायत कार्यालयावर धडक देत मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंका शिंदे यांना घेराव घातला. यावेळी ५० हून अधिक महिला नगरपंचायत कार्यालयात दाखल झाल्या. त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच नगरपंचायतीच्या ढिसाळ नियोजनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

यावेळी सुनीताताई सोबले यांनी सांगितले की, बीएसएनएल कार्यालय ते विधाटे वस्ती या रस्त्यासाठी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असतानाही संबंधित काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना साईड पट्ट्या करण्यात आलेल्या नाहीत. तसेच आवश्यक खडीकरण आणि डांबरीकरणही दर्जाहीन पद्धतीने करण्यात आल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या कामाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी आणि रस्ता नव्याने दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावा, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच, पुढील दोन महिन्यांत रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला नाही तर महिला मोठ्या प्रमाणावर धरणे आंदोलन करून नगरपंचायत कार्यालयासमोर चक्काजाम आंदोलन करतील, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी महिलांनी शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर असल्याचे निदर्शनास आणून दिले. अनेक भागांत दूषित पाणीपुरवठा होत असून पाणी व्यवस्थापनाचे कोणतेही प्रभावी नियोजन नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची तक्रार करण्यात आली.

शहरातील वाढती अस्वच्छता हा देखील प्रमुख मुद्दा महिलांनी उपस्थित केला. मटन मार्केट परिसरातील काही दुकानदार सागर भजनी मंडळाच्या पाठीमागील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकत असल्याने त्या परिसरात दुर्गंधी पसरते. या मार्गावरून अनेक नागरिक व प्रवासी ये-जा करतात. त्यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे महिलांनी सांगितले.

महिला प्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंका शिंदे यांच्यासमोर आपल्या विविध समस्यांचा पाढा वाचत नगरपंचायतीच्या ढिसाळ नियोजनामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे स्पष्ट केले. सर्व प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करणारे निवेदनही यावेळी मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले.

# सण-उत्सवांच्या ऑफर्सच्या नावाखाली सायबर जाळे; नागरिकांनी राहावे सतर्क

## अतुल बोऱ्हाडे यांचे आवाहन : संशयास्पद लिंक, झघ फाईल्सपासून दूर राहा

मुंबई (समर्थ गांवकरी)

सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर आकर्षक ऑफर्स, मोफत गिफ्ट आणि बक्षिसांचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगार नागरिकांची फसवणूक करत असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते व कर सल्लागार अतुल बोऱ्हाडे यांनी दिला आहे.

व्हॉट्सप, सोशल मीडिया किंवा एसएमएसद्वारे पाठविण्यात येणाऱ्या संशयास्पद लिंक्सवर क्लिक केल्यानंतर झघ किंवा नखझ फाईल डाउनलोड करण्यास भाग पाडले जाते. अशा फाईल्स इन्स्टॉल झाल्यास मोबाईलवरील माहिती धोक्यात येण्याबरोबरच संपर्क यादीतील इतरांनाही त्याच फसव्या लिंक्स पाठवल्या जाण्याची शक्यता असते.

मोबाईल अचानक हँग होणे, गरम होणे, अनोळखी संदेश आपोआप पाठवले जाणे किंवा बँक खात्यात संशयास्पद व्यवहार दिसणे ही सायबर हल्ल्याची संभाव्य लक्षणे असल्याचे बोऱ्हाडे यांनी सांगितले.

त्यांनी नागरिकांना अनोळखी लिंक्सवर क्लिक न करण्याचे, Google Play Store व्यतिरिक्त इतरत्रून प्स डाउनलोड न करण्याचे, ओटीपी, पासवर्ड किंवा बँक खात्याची माहिती कोणाशीही शेअर न करण्याचे तसेच मोबाईल नियमित अपडेट ठेवण्याचे आवाहन केले.



एक चुकीची क्लिक तुमची आर्थिक आणि वैयक्तिक माहिती धोक्यात आणू शकते. सतर्क राहा, सुरक्षित राहा आणि इतरांनाही जागरूक करा, असे आवाहन करसाल्लगार अतुल बोऱ्हाडे यांनी केले.

# पेट्रोल, डिझेल आणि जेट इंधनावर विंडफॉल टॅक्स वाढला; सरकारचा मोठा निर्णय, इंधनाच्या किमती वाढणार का?

## निर्यात शुल्कात मोठी वाढ; देशांतर्गत इंधनाचा पुरवठा कायम ठेवण्यासाठी केंद्राचा निर्णय

केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेल आणि विमानांमध्ये वापरल्या जाणाऱ्या एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (ढऋ) अर्थात जेट इंधनावरील विंडफॉल टॅक्समध्ये मोठी वाढ केली आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, हे नवीन दर ३ ऑगस्टपासून लागू झाले असून त्याचा उद्देश देशांतर्गत इंधनाचा पुरेसा साठा राखणे आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउतारांवर नियंत्रण ठेवणे हा आहे.

नवीन निर्णयानुसार, पेट्रोलवरील निर्यात शुल्क प्रति लिटर २.५ रुपयांवरून ३.५ रुपये करण्यात आले आहे. डिझेलवरील एकूण निर्यात शुल्क १५.५ रुपयांवरून २५.५ रुपये प्रति लिटरपर्यंत वाढवण्यात आले आहे. तसेच एटीएफवरील निर्यात शुल्क १४.५ रुपयांवरून २२ रुपये प्रति लिटर करण्यात आले आहे.




सरकारच्या मते, आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतीतील चढउतार आणि भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा अबाधित राहावा आणि निर्यातीमधून होणारा अतिरिक्त नफा नियंत्रित ठेवता यावा, यासाठी विंडफॉल टॅक्समध्ये वाढ करण्यात आली आहे.

या निर्णयाचा सर्वसामान्य ग्राहकांवर थेट परिणाम होणार नाही. कारण हा कर पेट्रोल, डिझेल आणि एटीएफची निर्यात करणाऱ्या कंपन्यांवर लागू होतो.

# अहिल्यानगरमध्ये ११२% पाऊस, तर नाशिकमध्ये....; नाशिक विभागातील जिल्ह्यांची स्थिती काय ?

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

गेल्या काही दिवसांत राज्यात पावसाने धुव्वादार बॅटिंग केली आहे. त्यामुळे अनेक जिल्ह्यातील नदी नाले भरले असून धरणे ओसंडून वाहत आहे. जिल्ह्यात एकीकडे मुसळधार पावसाने पूर परिस्थिती निर्माण झाली असली तरी काही जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडलेला नाही. नाशिक विभागात सर्वाधिक पावसासाठी इगतपुरी तालुका ओळखला जातो. या तालुक्यात १,७३६ मिमी पाऊस अपेक्षित असताना आतापर्यंत केवळ ५० टक्के पाऊस झाला आहे.

तर अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात सरासरी २६६ मिमी पावसाच्या तुलनेत तब्बल २०२ टक्के पाऊस झाला आहे. नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात सरासरी ४४३ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ ३७ टक्के पाऊस झाला आहे. तर संगमनेर तालुक्यात १७१ मिमी अपेक्षित पावसाच्या तुलनेत १२३ टक्के पाऊस झाला आहे. नाशिक (छरीहळज्ञ) विभागात १ जून ते ३ ऑगस्टदरम्यान ३७७.३ मिलीमीटर सरासरीच्या तुलनेत ३६८.० मिलीमीटर, म्हणजेच ९७.५ टक्के पाऊस झाला आहे. तर जून महिन्यात पावसाचे प्रमाण अतिशय कमी होते. जुलैमध्ये मात्र पावसाने ही कसर चांगलीच भरून काढली.

नाशिक विभागातील जिल्ह्यांची स्थिती काय ?

नाशिक जिल्ह्यात आतापर्यंत ५३१.३ मिलीमीटर (१०४.४ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात २४०.३ मिलीमीटर (१११.८ टक्के), धुळे जिल्ह्यात ३४५.७ मिलीमीटर (११३.२ टक्के) आणि जळगाव (गरश्रसरेप) जिल्ह्यात ३८९.५ मिलीमीटर (११७.४ टक्के) पाऊस झाला आहे. नंदुरबार जिल्ह्यात मात्र आतापर्यंत २६३.७ मिलीमीटर (५४.३ टक्के) पावसाची नोंद झाली आहे.

१० तालुक्यांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस

नाशिक विभागातील ५४ तालुक्यांपैकी ३४ तालुक्यांमध्ये अपेक्षित सरासरीच्या १०० टक्क्यांहून अधिक पाऊस झाला आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील १२, जळगाव जिल्ह्यातील १०, अहिल्यानगर जिल्ह्यातील आठ आणि धुळे जिल्ह्यातील चार तालुक्यांचा समावेश आहे. विभागातील १० तालुक्यांमध्ये ७५ ते १०० टक्क्यांदरम्यान पाऊस झाला. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, यावल, जामनेर, बोदवड आणि जळगाव, नाशिक जिल्ह्यातील पेठ व येवला, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता व नेवासा तसेच नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्याचा समावेश आहे. उर्वरित १० तालुक्यांमध्ये सरासरीच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. विभागात सर्वात कमी पाऊस झालेल्या तालुक्यांमध्ये नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा (३७.१ टक्के), अक्राणी (४०.८ टक्के), नंदुरबार (४६.९ टक्के), शहादा (४७.६ टक्के) आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी (४८.२ टक्के) यांचा समावेश आहे.

# दीड वर्षांत जनतेने तुमचा खरा चेहरा ओळखला; संगमनेरची जनता बाळासाहेब थोरात यांच्या पाठीशी ठाम : संपतराव डोंगरे यांची टीका

संगमनेर (समर्थ गांवकरी)



विकसित संगमनेरला अवैध धंद्यांचे आगर बनवणे, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी मंजूर करून आणलेल्या विकासकामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे, संगमनेर तालुक्याला शून्य रुपये पीक विमा मिळणे, संगमनेर मार्गे प्रस्तावित नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्प रद्द होणे, तालुक्याच्या दृष्टीने गैरसोयीच्या नवीन तहसील कार्यालयाच्या प्रस्तावावर मौन बाळगणे, वीजपुरवठ्याची अवस्था बिघडवणे आणि मोठ्या संघर्षातून मिळालेल्या पाण्याचे योग्य नियोजन न करणे ही अवघ्या दीड वर्षांतील अपयशाची यादी आहे. त्यामुळे संगमनेरच्या जनतेने तुमचा खरा चेहरा ओळखला आहे, अशा शब्दांत शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे यांनी नाव न घेता आमदार अमोल खताळ यांच्यावर जोरदार टीका केली.

संपतराव डोंगरे म्हणाले, संगमनेर तालुक्याचा विकास हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या सातत्यपूर्ण संघर्षाचा आणि जनतेच्या विश्वासाचा परिणाम आहे. एकेकाळी राज्यातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जाणारा संगमनेर आज महाराष्ट्रातील सर्वाधिक विकसित तालुक्यांपैकी एक मानला जातो. हा बदल सहज घडलेला नाही, तर दशकांतील नियोजन, संघर्ष आणि विकासदृष्टीचा परिणाम आहे.

ते पुढे म्हणाले, १९८५ मध्ये रोजगार हमी योजनेवर सर्वाधिक मजूर काम करणारा तालुका म्हणून संगमनेरची ओळख होती. आज मात्र रोजगारनिर्मिती आणि विकासाच्या संधींमध्ये संगमनेर आघाडीवर आहे. हा इतिहास पुसण्याचा किंवा त्याचे श्रेय दुसऱ्यांनी घेण्याचा प्रयत्न करू नये. स्वतःला निधी आणता येत नसेल किंवा विकासकामे करता येत नसतील तर खोटे आरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचे काम थांबवावे.

यावेळी उपसरपंच अरुण गुंजाळ यांनीही आमदारांवर टीका करताना म्हटले, विकासकामे, त्यांचा निधी आणि अंमलबजावणी याबाबत कोणतीही माहिती नसताना काही कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. निमज येथे ज्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न झाला, त्यामध्ये आमदारांचे कोणतेही योगदान नाही. ग्रामपंचायतीच्या निधीतून झालेल्या दलित वस्ती सुधार योजनेतील २० लाख रुपयांच्या कामात आमदारांचा काय संबंध? राज्यभर राबविण्यात येणाऱ्या अंगणवाडी योजनेचे श्रेयही स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गुंजाळ पुढे म्हणाले, जलजीवन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामात आमदारांच्या हस्तक्षेपामुळे आणि त्यांच्या समर्थकांच्या कारभारामुळे अडथळे निर्माण झाले. आज ज्या कामांचे श्रेय घेतले जात आहे, त्यांपैकी अनेक कामांना अद्याप प्रशासकीय मंजुरीही मिळालेली नाही.

# नामस्मरणातूनच आत्मस्वरूपाची ओळख; गोंदवलेकर महाराज मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

## देहबुद्धीच्या विस्मरणासाठी नाम आवश्यक; नामातच परमेश्वरप्राप्तीचा सहज मार्ग : ह.भ.प. गंगाधर महाराज झाडे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शीलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे कीर्तन, काला फोडणे आणि महाप्रसादाच्या भक्तिमय कार्यक्रमाने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

या प्रसंगी ह.भ.प. गंगाधर महाराज झाडे यांचे प्रभावी कीर्तन आणि आध्यात्मिक निरूपण हे सप्ताहाचे प्रमुख आकर्षण ठरले. मंदिर परिसरात अखंड हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.

कीर्तनात मार्गदर्शन करताना ह.भ.प. गंगाधर महाराज झाडे म्हणाले की, परमेश्वराचा अंश प्रत्येक प्राणीमात्रामध्ये आहे. मात्र त्या परमसत्याची जाणीव करून घेण्याची बुद्धी केवळ मनुष्याला लाभली आहे. जीव हा मुळात परमेश्वरस्वरूपच असल्यामुळे स्वतःची खरी ओळख करून घेण्यासाठी नामस्मरणाशिवाय दुसरा कोणताही सहज आणि शाश्वत मार्ग नाही. देह, अहंकार, मोह आणि मायेच्या पाशात अडकलेल्या मनाला मुक्त करण्याचे सामर्थ्य केवळ भगवंताच्या नामात आहे.

देहबुद्धीचा विसर पडून आत्मबुद्धी जागृत व्हावी, यासाठी अखंड नामस्मरण आवश्यक आहे. ज्या क्षणी मनुष्याच्या मुखी आणि अंतःकरणात भगवंताचे नाम अखंड वास करू लागते, त्या क्षणापासून त्याच्या जीवनातील दुःख, चिंता आणि अस्थिरता दूर होऊ लागते.

ते पुढे म्हणाले, गुरु हा केवळ व्यक्ती नसून तो ज्ञानाचा अखंड प्रवाह आहे. गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. गुरुकृपेशिवाय नामाची गोडी लागत नाही आणि नामाशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस बाह्य सुखांच्या मागे धावत आहे; मात्र अंतःकरणातील शांती त्याला सापडत नाही. ही शांती मिळवायची असेल तर संतांनी दाखविलेल्या नामभक्तीच्या मार्गाचा स्वीकार करणे गरजेचे आहे. संतांच्या विचारांचे आचरण, सत्संग, हरिपाठ, कीर्तन आणि भागवत श्रवण यामुळे जीवनाला योग्य दिशा मिळते. प्रत्येक घरातून नामाचा नाद घुमू लागला, तर समाजातील वैर, मत्सर आणि अस्वस्थता आपोआप दूर होईल.

या अखंड हरिनाम सप्ताहात श्रीमद् भागवत कथेचे निरूपण ह.भ.प. धनंजय महाराज क्षीरसागर यांनी केले. त्यांनी भागवत धर्माचे महत्त्व, भक्तीमार्गाची परंपरा आणि संत साहित्याचा जीवनावर होणारा परिणाम यांचे रसाळ विवेचन करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात



तल्लीन केले. त्यांच्या कथेमुळे सप्ताहभर मंदिरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या ग्रंथांचे पारायण आणि वाचन सोहळाही मोठ्या भक्तिभावाने पार पडला. व्यासपीठ संचालन सौ. मनीषा भोंग यांनी केले. सप्ताहादरम्यान अखंड नामजापासाठी ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळाचे सदस्य नियोजनबद्ध पद्धतीने सेवेत सहभागी झाले. त्यांच्या अथक सेवेमुळे सप्ताह यशस्वीपणे पार पडल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने आणि पारंपरिक पद्धतीने काला फोडून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत समर्थ लखापतीला कास्यपदक

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

बारामती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल मधील इयत्ता सातवी मधील इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी समर्थ चेतन लखापती याने बारा वर्षाच्या वयोगटात भाग घेऊन अवघ्या चार महिन्यातील सरावांमध्ये ४० स्केटिंग स्पर्धकांमध्ये विजयी घोडदौड करीत टॉप टेन मध्ये कांस्यपदक मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळवीत शाळेबरोबरच अहिल्यानगरचे नाव उज्वल केले आहे.



महाराष्ट्र राज्य मॅरेथॉन स्पर्धा मध्ये ७०० ते ८०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. अहिल्यानगर मॅरेथॉन स्केटिंग क्लबमधून ७० स्पर्धक होते. ४ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी दाखवली. त्यामुळे क्लबला ३५ गोल्ड मेडल, २० सिल्वर मेडल व १५ कांस्य मेडल तसेच सर्टिफिकेट, ट्रॉफी मिळाल्या. अहिल्यानगर मॅरेथॉन स्केटिंग क्लब ने २४ जिल्ह्यांमधून प्रथम क्रमांक पटकावून सहा फूट उंचीची ट्रॉफी मिळवली महाराष्ट्र राज्य ट्रॉफीवर क्लब ने नाव कोरल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस पदी रमेश बोरुडे

राहुरी (समर्थ गांवकरी)



राज्यातील अग्रगण्य समजल्या जाणार्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा अहिल्यानगर दक्षिण जिल्हा सरचिटणीस पदी जेष्ठ पत्रकार रमेश प्रभाकर बोरुडे यांची निवड करण्यात आली. प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी निवडीचे पत्र दिले.

राज्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी शासकीय स्तरावर न्याय मिळवून देणारी संघटना म्हणून राज्यात वेगळी ओळख आहे. काम संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्ह्यातही संघटनेचे काम जोमाने सुरू आहे. संघटना बळकटीसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील विविध वृत्तपत्रांमध्ये काम करणार्या पत्रकारांचा संघटनेत सहभागी करून संघटना मजबूत करण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्हा दक्षिण विभागाची सरचिटणीस पदाची जबाबदारी राहुरी तालुक्यात गेली चाळीस वर्षांपासून सातत्याने विविध वृत्तपत्राच्या माध्यमातून पत्रकारिता क्षेत्रात मोलाची कामगिरी करत असलेले जेष्ठ पत्रकार रमेश प्रभाकर बोरुडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तालुक्यातील विविध विषयांवर लिखाण करुन अन्याय अत्याचारा विरोधात वाचा फोडली आहे. जिल्ह्यातील लोकप्रिय दैनिकांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आदी विविध विषयांवर आपल्या लेखणीने छाप पाडली आहे. तालुक्यातील पत्रकार संघटनेत यापूर्वी विविध पदांवर काम केले असल्याने त्यांच्या अनुभवाचा व संघटन कौशल्याचा फायदा निश्चितच संघटनेला होणार असल्याने प्रतिपादन संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी श्री. बोरूडे यांच्या सत्कारप्रसंगी केले.

### शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या यशाने महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा गौरव

कारंजकर कुटुंबाकडून शिक्षक-सेवकांचा सत्कार



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरल्याने विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अभिमानास्पद यशानिमित्त कारंजकर कुटुंबाच्या वतीने विद्यालयातील शिक्षक व सेवकांचा सत्कार समारंभ उत्साहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात कारंजकर कुटुंबाने विद्यालयाला आकर्षक स्मृतिचिन्ह (ट्रॉफी) प्रदान करून गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचा गौरव केला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत हे महत्त्वाचे घटक असल्याचे सांगत विद्यालयाचे अभिनंदन केले. या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री बाबासाहेबजी भोस, उत्तर विभाग गुणवत्ता विकास कक्षाचे मार्गदर्शक मा. श्री काकासाहेब वाळुंजकर, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य श्री दिलीप भुजबळ, ज्येष्ठ पत्रकार श्री पिटर रणसिंग, श्री माधव बनसोडे, श्री विष्णू धुमाळ, श्री दत्तात्रय पाचपुते तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री रामदास ठाकर सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# कठोर परीश्रम, सातत्य, चिकाटी इ.गुण सर्वांगीन प्रगतीसाठी अत्यावश्यक-रमेश मिसाळ,अप्पर जिल्हाधिकारी

## श्री तिलोक जैन विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारोह संपन्न

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

पूर्वीचे शिक्षण वेगळ्या पद्धतीचे होते. आज पदोपदी प्रचंड स्पर्धा आहे. या स्पर्धात्मक परिस्थितीत अपयशाने खचून न जाता कठोर परीश्रम , सातत्य , जिद्द , चिकाटी इ . गुण आत्मसात केल्यास यश निश्चित प्राप्त होवू शकते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना जर सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सहशालेय उपक्रम, वरीष्ठांशी बोलणे , चिकीत्सक विचारपद्धती , सहकार्याची भावना , क्रियाशीलता , आत्मविश्वास , इच्छाशक्ती सकारात्मक वृत्ती इ. बाबी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेतच,असे प्रतिपादन रमेश मिसाळ,अप्पर जिल्हाधिकारी , जालना यांनी व्यक्त केले. श्री तिलोक जैन विद्यालयात संस्थेचे आद्य अध्यक्ष स्व .मोतीलालजी गुगळे यांची पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला त्यावेळी ते प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. या वेळी व्यासपीठावर श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतिश गुगळे , खजिनदार सुरेश कुचेरिया , विश्वस्त डॉ. ललित गुगळे , कार्यकारी मंडळाचे सदस्य कांतीलाल गुगळे, संपतलाल गांधी, घेवरचंद भंडारी , चांदमल देसर्ड , डॉ. सचिन गांधी , डॉ.अभय भंडारी, विश्वजीत गुगळे, महेंद्र गुगळे , सोनू गुगळे, प्राचार्य अजय भंडारी,प्रा. विजय तागड , पर्यवेक्षक भारत गाडेकर, विभाग प्रमुख सुधाकर सातपुते आदी उपस्थित होते.या वेळी अध्यक्ष पदावरून बोलताना सतिश गुगळे म्हणाले की , स्व.मोतीलालजी गुगळे यांनी शंभर वर्षांपूर्वी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम केले. स्व .गुगळे यांनी आर्थिक निधी देऊन समाजाला शिक्षण संस्था उभारण्यासाठी दान करण्याची सवय लावली. त्यामुळे त्यांचे हे कार्य महान आहे. यावेळी विश्वस्त डॉ . ललीत गुगळे, उद्धव चन्ने यांनी मोतीलालजी गुगळे यांचे जीवनकार्य विषद केले. पर्यवेक्षक भारत गाडेकर यांनी अहवाल वाचन केले. या वेळी कला , क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केलेल्या १जज विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र



व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या वेळी स्व. हनुमंतराव श्रीनिवास देशमुख व स्व. श्रीमती दुर्गाबाई हनुमंतराव देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ डॉ.भानुदास हनुमंतराव देशमुख यांच्या वतीने इ. बारावी मधील प्रथम विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना रोख स्वरूपात पारितोषिक देण्यात आले तसेच कै.परशुराम मेहेंदळे व निर्मलाबाई मेहेंदळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ संस्कृत व इंग्रजी विषयातील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना देखील मेहेंदळे परिवारातर्फे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी विशेष बाब म्हणजे रमेश मिसाळ यांनी आपल्या प्रगतीत संस्थेचा फार मोलाचा वाटा असल्याचे नमूद करून संस्थेप्रती ऋण व्यक्त करण्याच्या उद्देशाने एक लाख रुपयाची धनराशी प्रदान केली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अजय भंडारी यांनी केले तर सुत्रसंचालन सुनील कटारिया यांनी करून आभार विभाग

## अॅड. प्रकाश संसारे यांची काँग्रेसच्या एस.सी. विभागाच्या राज्य सरचिटणीसपदी नियुक्ती

देवळाली प्रवरा (समर्थ गांवकरी)

देवळाली प्रवरा येथील ज्येष्ठ विधिज्ञ व काँग्रेसचे सक्रिय पदाधिकारी ड. प्रकाश संसारे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत एस.सी. विभाग कार्यकारी समितीच्या राज्य सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे देवळाली प्रवरासह राहुरी तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



एस.सी. विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री आ. राजेंद्र पाल गौतम यांनी ड. प्रकाश संसारे यांच्या सामाजिक कार्याची, संघटन कौशल्याची आणि पक्षाप्रती असलेल्या निष्ठेची दखल घेत ही नियुक्ती जाहीर केली आहे. राज्य सरचिटणीस या जबाबदारीच्या माध्यमातून अनुसूचित जाती समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे, पक्ष संघटना अधिक सक्षम करणे तसेच राज्यभर पक्षाच्या विविध उपक्रमांना गती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

# नवीन मराठी प्राथमिक शाळेत तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

## लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

जामखेड (समर्थ गांवकरी)

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून जामखेड येथील लोकमान्य तरुण, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संचलित नवीन मराठी प्राथमिक शाळेत तालुका स्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. गेल्या तब्बल १७ वर्षांपासून ही स्पर्धा सातत्याने आयोजित केली जात असून यंदाही तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्य, विचारशक्ती, अभ्यासू वृत्ती आणि सामाजिक जाण विकसित व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांना दोन गटांमध्ये विभागण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते सातवी या विद्यार्थ्यांसाठी लहान गट, तर इयत्ता आठवी ते दहावी या विद्यार्थ्यांसाठी मोठा गट ठेवण्यात आला होता.

लहान गटासाठी 'शिस्त हिच यशाची गुरुकिल्ली', 'लोकमान्य टिळक : जीवन व कार्य', 'पर्यावरण संवर्धन माझी जबाबदारी' आणि 'भारतीय संस्कृतीतील कुटुंब व्यवस्था' हे विषय देण्यात आले होते. तर मोठ्या गटासाठी 'संविधान व माझी जबाबदारी', 'भारतीय स्वातंत्र्याच्या असंतोषाचे जनक', 'ध्येय निश्चितीचे महत्त्व' तसेच 'अल्निनोचे परिणाम व जलसंधारण गरज' हे विषय निश्चित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या विषयांवर अभ्यासपूर्ण, प्रभावी आणि आत्मविश्वासपूर्ण भाषणे सादर करून परीक्षकांची मने जिंकली.

वक्तृत्व स्पर्धेच्या लहान गटात प्रथम क्रमांक आरोही रोहित पारखे



(नवीन मराठी प्राथमिक शाळा), द्वितीय क्रमांक तृप्ती श्रीकांत उकिरडे (कन्या विद्यालय) आणि तृतीय क्रमांक यश बाळासाहेब केसकर (ल.ना. होशिंग) यांनी मिळविला.

मोठ्या गटात प्रथम क्रमांक तेजश्री संदीपान सांगळे (कन्या विद्यालय), द्वितीय क्रमांक दुर्वा चंद्रकांत भुजबळ (कन्या विद्यालय, जामखेड) तर तृतीय क्रमांक अनुष्का योगेश राळेभात (ल.ना. होशिंग विद्यालय) यांनी पटकाविला. स्पर्धेतील सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा १५ ऑगस्ट रोजी आयोजित स्वातंत्र्यदिन कार्यक्रमात रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच लोकमान्य तरुण, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले तसेच अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोठी चालना मिळत असल्याचे मत व्यक्त केले.

# डॉ. मीरा ढास यांनी स्वीकारला शिर्डी येथील माहिती अधिकारी पदाचा कार्यभार

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिपत्याखालील उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे प्रशासकीय बदलीने नियुक्त झालेल्या डॉ. मीरा ढास यांनी आज माहिती अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

डॉ. ढास या जुलै २००८ मध्ये शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागात उपसंपादक म्हणून मंत्रालय, मुंबई येथे रुजू झाल्या. त्यानंतर त्यांनी जिल्हा माहिती कार्यालय, पुणे तसेच विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सहाय्यक संचालक म्हणून कार्य केले. पुढे जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर त्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तेथून प्रशासकीय बदलीने त्यांची उप माहिती



कार्यालय, शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आज पदाचा कार्यभार स्वीकारला.

पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. मीरा ढास यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. मीरा ढास यांनी सांगितले की प्रभावी संवाद कौशल्याच्या आणि विविध समाज माध्यमातून शासनाच्या जन कल्याणकारी योजना व विविध उपक्रमांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. शिर्डी हे ठिकाण श्री साईबाबा यांच्या पावन भूमीमुळे प्रसिद्ध आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक दर्शनासाठी येत असतात.साई भक्तांसाठी, आणि नागरिकांसाठी शासन विविध स्तरावरून सुविधा उपलब्ध करुन देत आहे. या उपक्रमाला लोकांसमोर सकारात्मक पद्धतीने आणण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उप माहिती कार्यालय, शिर्डी येथील कर्मचारी श्री. मंगेश रसाळी व श्री. अभिजीत मुठे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. मीरा ढास यांचे स्वागत केले तसेच त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# व्हॉट्सपने अनेक भारतीय वापरकर्त्यांची खाती तात्पुरती केली ब्लॉक

इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म व्हॉट्सपने भारतीयांसह अनेक वापरकर्त्यांची खाती तात्पुरती ब्लॉक केल्याने सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. अनेक वापरकर्त्यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत, त्यांची खाती २४ तासांसाठी पुनरावलोकनाखाली ठेवण्यात आल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे संबंधित वापरकर्त्यांना या कालावधीत व्हॉट्सप वापरता आले नाही.

सोमवारी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास अनेक वापरकर्त्यांना व्हॉट्सपमध्ये अडचणी येऊ लागल्या. त्यानंतर ॲपमध्ये तुमच्या खात्याची तपासणी सुरू आहे असा संदेश दिसू लागला. या संदेशात खात्यावरील हालचाली आणि डिव्हाइसची माहिती कंपनीच्या नियमांनुसार आहे की नाही, याची पडताळणी केली जात असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच २४ तासांच्या आत निर्णय कळवला जाईल, असेही सांगण्यात आले.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना व्हॉट्सपच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, प्लॅटफॉर्मचा गैरवापर रोखण्यासाठी संशयास्पद खात्यांवर नियमितपणे कारवाई केली जाते. इतर वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेसाठी काही खाती तात्पुरती ब्लॉक केली जातात. मात्र, काही वेळा चुकीनेही खाती निलंबित होऊ शकतात. अशा प्रकरणांची तपासणी करून पात्र खात्यांची सेवा शक्य तितक्या लवकर पूर्ववत केली जाते, असे कंपनीने स्पष्ट केले.

दरम्यान, अनेक वापरकर्त्यांनी आपण केवळ अधिकृत व्हॉट्सप ॲपच वापरत असूनही खाते अचानक निलंबित झाल्याची तक्रार केली आहे.

# ब्राम्हणवाडा-बोटा मार्गावरील अवैध दारू अड्ड्यांचा पुन्हा धुमाकूळ

## शालेय विद्यार्थी, महिला आणि ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

### वारंवार धाडी, तरीही अवैध दारू विक्री सुरूच; या धंद्यांना नेमके कोणाचे अभय? : पत्रकार व दारूबंदी कार्यकर्ते संजय गायकर यांचा सवाल?

अकोले (समर्थ गांवकरी)

**अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावाजवळील ब्राम्हणवाडा-बोटा या मुख्य रस्त्यालगत गावापासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर दोन ठिकाणी अवैध दारू विक्रीचे अड्डे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या अड्ड्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभाग (एक्साईज) तसेच अकोले पोलीस ठाण्याच्या पथकांकडून अनेक वेळा धाडी टाकण्यात आल्या असून कारवाईही करण्यात आली. मात्र प्रत्येक कारवाईनंतर काही दिवसांतच हे अड्डे पुन्हा पूर्ववत सुरू होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**




या मार्गावरून दररोज ब्राम्हणवाडा व परिसरातील शेकडो शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, महाविद्यालयीन युवक-युवती तसेच महिला ये-जा करतात. त्यामुळे या अवैध दारू अड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी शाळेच्या वेळेत आणि सायंकाळी शाळा सुटल्यानंतर या परिसरात मद्यपींचा वावर वाढत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या अड्ड्यांवर दररोज मद्यपींची गर्दी होत असून किरकोळ कारणांवरून वाद, भांडणे, मारामाऱ्या, आरडाओरडा आणि अश्लील शिवीगाळ यांसारखे प्रकार घडत असतात. अनेकदा मद्यधुंद अवस्थेतील व्यक्ती रस्त्यालगतच लघुशंका करत असल्याने परिसरातील महिलांना आणि विद्यार्थिनींना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही मद्यपींकडून अश्लील हावभाव व अर्वाच्य भाषेचाही वापर होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, या अवैध धंद्यांबाबत वारंवार तक्रारी करूनही आणि वेळोवेळी पोलिसांकडून धाडी टाकूनही संबंधितांवर अशी कोणतीही कठोर कारवाई झालेली दिसून येत नाही की ज्यामुळे हा अवैध व्यवसाय कायमचा बंद होईल. त्यामुळे कारवाई केवळ कागदोपत्रीच होते का?, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.




काही स्थानिकांच्या दाव्यानुसार, संबंधित दारू विक्रेते उघडपणे आम्हाला कोणाची भीती नाही, आमच्या पाठीशी वरपर्यंतचा वरदहस्त आहे. आमचे कोणी काहीही बिघडवू शकत नाही, अशा प्रकारची भाषा वापरत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या धंद्यांना नेमके कोणाचे संरक्षण मिळत आहे, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे. मात्र या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही.ग्रामस्थांच्या मते, हा प्रश्न केवळ अवैध दारू विक्रीपुरता मर्यादित नसून तो आता कायदा व सुव्यवस्था आणि महिला सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय बनला आहे. भविष्यात एखाद्या शालेय विद्यार्थिनी किंवा महिलेसोबत अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

पत्रकार तसेच दारूबंदी कार्यकर्ते संजय गायकर यांनी या प्रकरणात अकोले पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे व्यापक मोहीम राबवून संबंधित अवैध दारू अड्डे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी केली आहे. केवळ धाडी टाकून किंवा किरकोळ गुन्हे दाखल करून हा प्रश्न सुटणार नसून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करून या अवैध व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि ब्राम्हणवाडा-बोटा मार्गावरील नागरिक, महिला व विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे.